# अभंग - ज्ञानेश्वरी
## अध्याय सहावा

धृतराष्ट्रालागीं । म्हणे तो संजय । आतां [१]अभिप्राय । ऐका तो चि ॥१॥
योग जो *अष्टांग । सांगेल साचार । देव योगेश्वर । कौन्तेयासी ॥२॥
वाढिलें सहज । ज्ञानाचें पक्वान्न । अर्जुनालागोन । नारायणें ॥३॥
त्याचि वेळीं आम्ही । सुदैवेंकरोनि । पाहुणे म्हणोनि । पातलों कीं ॥४॥
लागतां तहान । पाणी पिऊं जावें । अमृत लाभावें । तों चि तेथें ॥५॥
तैसें तुम्हां-आम्हां । जाहलें हो आज । लाधलें सहज । ब्रह्मज्ञान ॥६॥
तंव धृतराष्ट्र । संजयालागोनि । म्हणे तुज कोणीं । पुसिलें हें ॥७॥
रायाचें हृदय । देखा येणें बोलें । भलें कळों आलें । संजयासी ॥८॥
असे पुत्र-प्रेमें । घेतलें व्यापोनि । जाणोनि हें मनीं । हांसला तो ॥९॥
म्हणे हा म्हातारा । मोहें वायां गेला । संवाद जाहला । भला येथें ॥१०॥
परी तयालागीं । कैसा हा रुचेल । केविं उजाडेल । जन्मांधातें ॥११॥
तरी धृतराष्ट्र । होईल तो [२]रुष्ट । म्हणोनि हें स्पष्ट । उच्चारी ना ॥१२॥
असो, तो संवाद । ऐकोनियां तेथें । झाला संजयातें । तोष बहु ॥१३॥
मग त्या आनंदें । होवोनियां तृप्त । आदरें यथार्थ । अभिप्राय ॥१४॥
धृतराष्ट्रालागीं । बोलेल संजय । तो चि षष्ठाध्याय । गीतेचा हा ॥१५॥
देखा कथाभाग । सर्वथा येथील । अत्यंत सखोल । [३]बुद्धिग्राह्य ॥१६॥
* क्षीरसागराचें । करोनि मंथन । अमृत त्यांतून । निवडिलें ॥१७॥

---

*परिशिष्ट पहा.   १ आशय; भावार्थ.   २ रागावलेला.   ३ बुद्धीनें (विचारानें) समजून घेण्यासारखा.

तैसा हा सहावा । अध्याय गंभीर । देखा असे सार । गीतार्थाचें ।।१८।।
विवेक-सिंधूचें । किंवा पैलतीर । म्हणों ये साचार । अध्याय हा ।।१९।।
ना तरी भांडार । योग-वैभवाचें । उघडलें साचें । म्हणावें का ।।२०।।
आदिमायेचें जें । विश्रांतीचें स्थान । वेदांसी हि मौन । पडे जेथें ।।२१।।
तेविं गीतारूपी । वेलीचे अंकुर । पावती विस्तार । जेथोनियां ।।२२।।
ऐसा हा गंभीर । सहावा अध्याय । स्वभावें चि होय । मनोरम ।।२३।।
वरी [1]भूषवोनि । *साहित्यें सांगेन । ऐका अवधान । देवोनियां ।।२४।।
माझा जरी साधा । मराठा हा बोल । कौतुकें जिंकील । अमृतातें ।।२५।।
ऐसीं सुरसाळ । अक्षरें एकैक । प्रतिज्ञापूर्वक । मेळवीन ।।२६।।
सप्त सुरांचे हि । रंग होती थोडे । कोंवळिकेपुढें । जयाचिया ।।२७।।
जयाचिया [2]वेधें । सुगंधाचें बळ । मोडे, ऐसा बोल । मोहक जो ।।२८।।
रसाळ तो बोल । चाखावयासाठीं । ऐका जिभा होती । कानासी च ।।२९।।
आणि जेणें बोलें । इंद्रियें सकळ । भांडूं लागतील । एकमेक ।।३०।।
शब्द हा विषय । स्वभावें कानाचा । परी तो आमुचा । जिव्हा म्हणे ।।३१।।
घ्राणें तयालागीं । हुंगावया जावें । तों चि तयें व्हावें । सुगंधित ।।३२।।
अपूर्वता कैसी । शब्द-सौंदर्याची । [3]वाहणी ती साची । पाहोनियां ।।३३।।
संतुष्ट होवोन । बोलती नयन । रूपाची ही खाण । प्रकटली ! ।।३४।।
आणिक एकैक । जुळोनि अक्षरें । संपूर्ण उभारे । [4]पद जेव्हां ।।३५।।
तेव्हां इंद्रियांतें । टाकोनियां मागें । मन पडे वेगें । बाहेर तें ।।३६।।
मग घेई धांव । बाहू पसरोन । बोला आलिंगन । द्यावयासी ।।३७।।
ऐसीं इंद्रियें तीं । आपुलाल्या [5]भावीं । झोंबती आघवीं । बोलालागीं ।।३८।।
परी तो एकला । सर्वां हि लागोन । देई समाधान । सारिखें चि ।।३९।।
जागें करी जगा । एकला [6]सविता । तैसी व्यापकता । बोलाची ह्या ।।४०।।
देखा असामान्य । *चिंतामणिसम । गुण अनुपम । सर्व हि ते ।।४१।।
तयां आढळती । बोलामाजीं येथ । भाव जे यथार्थ । ओळखिती ।।४२।।

---

*परिशिष्ट पहा.　१ सजवून.　२ ओढीनें.　३ ओघ.　४ (अर्थपूर्ण) शब्द.　५ भावनेनें.　६ सूर्य.

असो ह्या बोलांचीं । ऐसीं तातें भलीं । घेवोनि भरिलीं । मोक्षरसें ।।४३।।
केली ग्रंथरूप । [१]पाकसिद्धी येथ । निष्काम जे संत । तयांसाठीं ।।४४।।
आतां *आत्म-प्रभा । जी का नित्य नवी । ती च [२]ठाणदिवी । करोनियां ।।४५।।
इंद्रियांसी कळों । न देतां जो जेवी । तयासी च व्हावी । प्राप्ति येथें ।४६।।
कर्णेन्द्रियालागीं । टाकोनियां मागें । मनाचे निजांगें । भोगावें हें ।।४७।।
शब्दाची वरील । काढोनियां साल । गाभा जो आंतील । अर्थरूप ।।४८।।
त्या चि अर्थब्रह्मीं । होवोनि तद्रूप । सुखें सुखरूप । भोगावें हें ।।४९।।
चित्तालागीं ऐसें । हळुवारपण । तरी च व्याख्यान । सफळ हो ।।५०।।
नाहीं तरी मुक्या–। बहिऱ्यांच्या गोष्टी । तैसें चि शेवटीं । होईल कीं ।।५१।।
परी तें राहू दे । आतां नको फार । आणिक विचार । श्रोतयांचा ।।५२।।
सर्वथा निष्काम । होती स्वभावें ते । अधिकारी येथें । ऐकावया ।।५३।।
आत्मबोधापुढें । तुच्छ वाटे साचें । स्वर्गसंसाराचें । सुख जयां ।।५४।।
तयांवांचोनियां । आणिक बापुडीं । जाणती ना गोडी । बोलाची ह्या ।।५५।।
सर्वथा [३]प्राकृत । जे का भोगासक्त । नाकळे हा ग्रंथ । तयांलागीं ।।५६।।
कावळे ते जैसे । नेणती चंद्रातें । तैसी स्थिती येथें । स्वभावें चि ।।५७।।
[४]शीतरश्मि चंद्र । तो चि *चकोराचें । गोड खाद्य साचें । होय जैसा ।।५८।।
तैसे जे सज्जन । तयांलागीं पूर्ण । विश्रांतीचें स्थान । गीता-ग्रंथ ।।५९।।
आणि जे अज्ञान । महामोहग्रस्त । अनोळखी प्रांत । तयांसी हा ।।६०।।
म्हणोनियां आतां । विषय हा राहो । काय बोलावें हो । विशेषत्वें ।।६१।।
प्रसंगानुसार । परी बोलिलों मी । क्षमावें तें तुम्हीं । सज्जनांनीं ।।६२।।
असो आतां काय । बोलिला श्रीरंग । तें चि तुम्हां [५]साङ्ग । निरूपीन ।।६३।।
होय जें बुद्धिसी । आकळाया जड । शब्दें अवघड । निवेदाया ।।६४।।
परि *श्रीनिवृत्ति–। कृपादीपें आज । पाहेन सहज । सर्व हि तें ।।६५।।
सुदैवें साचार । जरी प्राप्त होय । येथें *अतींद्रिय । ज्ञानबळ ।।६६।।
तरी निजदृष्टी । पोहोंचे ना जेथें । तें हि पाहू येतें । दृष्टीवीण ।।६७।।

---

*परिशिष्ट पहा. १ स्वयंपाक. २ ठाणवी; (लांकडी) समई. ३ सामान्य. ४ शीतल किरण असलेला.
५ संपूर्ण.

देखा दैवयोगें । परीस तो भला । जरी हातीं आला । आपुलिया ।।६८।।
तरी *किमयेनें । मिळे ना जें साच । [1]हेम तें लोहीं च । सांपडेल ।।६९।।
तैसी श्रीगुरूची । जरी कृपा होय । करितां तें काय । प्राप्त नोहे ।।७०।।
[2]अपार ती मातें । लाधली सदैव । म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।७१।।
म्हणोनि बोलोनि । रूप [3]अरूपाचें । दाखवीन साचें । बोलामाजीं ।।७२।।
अतींद्रिय परी । इंद्रियांकडोन । आतां भोगवीन । परब्रह्म ।।७३।।
असो ऐका जेथ । यश श्री औदार्य । वैराग्य ऐश्वर्य । आणि ज्ञान ।।७४।।
*षड्गुण हे श्रेष्ठ । आले आश्रयास । बोलती जयास । भगवंत ।।७५।।
जाहले [4]निःसंग । तयांचा जो सखा । श्रीहरि तो देखा । काय बोले ।।७६।।

श्रीभगवानुवाच–

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ।।१।।

म्हणे पार्था चांग । देवोनियां चित्त । ऐकें आतां मात । सांगतों जी ।।७७।।
सर्वथा संन्यासी । आणि कर्मयोगी । एक चि हे जगीं । जाण ऐसें ।।७८।।
वाटतील दोन्ही । तुज वेगळेसे । परी नको तैसे । मानूं बापा ।।७९।।
एऱ्हवीं दोहोंचा । करितां विचार । ऐसा चि निर्धार । एक चि ते ।।८०।।
वेगळालीं नांवें । म्हणोनियां साचा । वेगळेपणाचा । होई भास ।।८१।।
भिन्न नांवांचा तो । सांडितां आभास । योग चि संन्यास । ऐसें होय ।।८२।।
तत्त्वतां किरीटी । पाहूं जातां कांहीं । दोहोंमाजीं नाहीं । भेदभाव ।।८३।।
एका चि व्यक्तीतें । वेगळाल्या नांवें । जैसें [5]संबोधावें । व्यवहारीं ।।८४।।
वेगळाल्या मार्गीं । किंवा धनंजया । एका चि त्या ठायां । जावें जैसें ।।८५।।
नातरी सहजें । एक चि उदक । भरावें अनेक । पात्रांमाजीं ।।८६।।
तैसें चि भिन्नत्व । योग-संन्यासाचें । जाणावें गा साचें । नाममात्र ।।८७।।
करोनियां कर्में । फलीं अनासक्त । तो चि योगी येथ । सर्वमान्य ।।८८।।
जन्म देते भूमि । तृणादिकांलागीं । न राखितां अंगीं । अहंकार ।।८९।।

---

*परिशिष्ट पहा. १ सोनें. २ अतिशय; पुष्कळ. ३ अरूप अशा ब्रह्माचें. ४ सर्वसंगपरित्यागी. ५ हांक मारावी.

आणि अपेक्षी ना । तयांचीं तीं बीजें । अर्जुना सहजें । जैशा रीती ।।९०।।
तैसीं कुळाधारें । [1]स्ववर्णानुसार । [2]प्रसंगें साचार । होती प्राप्त ।।९१।।
तीं तीं सारीं कर्में । करी यथोचित । परी नाहीं युक्त । अहंकारें ।।९२।।
अंतरीं तों नाहीं । फलाची आसक्ति । ऐसीच विरक्ति । जया ठायीं ।।९३।।
ऐकें पार्था तो चि । संन्यासी संपूर्ण । निश्चयें तो जाण । योगीराज ।।९४।।
नाहीं तरी कर्में । *नित्य-नैमित्तिक । तयांतें [3]बद्धक । म्हणे जो का ।।९५।।
आणि बद्धक तें । म्हणोनियां सांडी । तों चि दुजें [4]मांडी । लगोलग ।।९६।।
पार्था जैसा लेप । धुवोनियां एक । सवें चि आणिक । लावावा गा ।।९७।।
तैसा तो होवोनि । आग्रहाचा दास । त्यागाचा सायास । करी वायां ।।९८।।
*गृहस्थाश्रमाचें । आधीं च तें ओझें । कपाळीं सहजें । आलें असे ।।९९।।
परी ते संन्यासें । फेकूं पाहे दूर । तों चि पुन्हां भार । संन्यासाचा ।।१००।।
म्हणोनि अग्नीची । न सांडितां सेवा । नोलांडितां जीवा । कर्मरेषा ।।१०१।।
आपुल्या चि ठायीं । आहे *योग-सुख । स्वभावें तें देख । पंडु-सुता ।।१०२।।

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।
न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ।।२।।

देवोनियां चित्त । आतां परियेसीं । सर्वथा संन्यासी । तो चि योगी ।।१०३।।
ऐसी नाना शास्त्रीं । एकवाक्यतेची । जगीं [5]ध्वजा साची । [5]उभारिली ।।१०४।।
जाण सर्वथैव । *संकल्प-निरास । होतसे संन्यास–। द्वारा जेथें ।।१०५।।
तेथें चि साचार । भेटे योग-सार । ऐसा चि निर्धार । स्वानुभवें ।।१०६।।
बाणला पूर्णत्वें । जयाचिया अंगीं । तो चि पार्था योगी । संन्यासी तो ।।१०७।।

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ।।३।।

आतां योगरूप । पर्वताचा माथा । गांठावा तत्त्वतां । ऐसें मनीं ।।१०८।।
तरी तेणें कर्म–। मार्गाचा [6]सोपान । सर्वथा तो जाण । सोडूं नये ।।१०९।।
*यम-नियमांच्या । पायथ्यावरोन । साधक चालोन । जातां पुढें ।।११०।।

---

१ आपल्या वर्णाप्रमाणें. २ ओघानें. ३ गुंतविणारीं. ४ आरंभितों. ५ घोषणा केली. ६ जिना.
*परिशिष्ट पहा.

मग *आसनाची । लागे पायवाट । पार्था ती हि नीट । आक्रमोनि ॥१११॥
येई चढोनियां । *प्राणायाम-घाट । जो का [1]ऐल कांठ । [2]योगाद्रीचा ॥११२॥
*प्रत्याहाररूप । बहु निसरडा । लागे अर्धकडा । मग पुढें ॥११३॥
जेथें बुद्धीचे हि । ठरती ना पाय । जेथें चळे धैर्य । बहुतांचें ॥११४॥
आपुली प्रतिज्ञा । सांडोनिया अंतीं । जेथें माघारती । हटयोगी ॥११५॥
ऐशा प्रत्याहारीं । अभ्यासाचें बळ । घेवोनि केवळ । *शून्याधारें ॥११६॥
वैराग्याची नखी । रोवोनियां तेथें । हळू हळू नेटें । चढूं लागे ॥११७॥
ऐसा प्राणापान–। वाहनावरोन । मार्ग आक्रमोन । *धारणेचा ॥११८॥
सर्वथा सावध । *साधक साचार । गांठितो शिखर । *ध्यानाचें तें ॥११९॥
मग मार्गाची त्या । सरोनियां धांव । [3]पुरे जेथें हांव । प्रवृत्तीची ॥१२०॥
*साध्य-साधनांसी । दृढ आलिंगन । जेथें पडे पूर्ण । [4]सामरस्यें ॥१२१॥
थांबती ज्या ठायीं । पाउलें पुढील । स्मरावें मागील । तें हि [5]ठाके ॥१२२॥
सम-भूमिकेंत । तेथें *समाधींत । पार्था अखंडित । स्थिरावे तो ॥१२३॥
येणें उपायें जो । योग-पारंगत । जाहला अत्यंत । परिपूर्ण ॥१२४॥
तया सिद्धाचीं तीं । लक्षणें गहन । उघड सांगेन । ऐक आतां ॥१२५॥

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥४॥

तरी जयाचिया । इंद्रियांच्या घरा । नाहीं येरझारा । विषयांच्या ॥१२६॥
आत्मज्ञानरूप । शेजघरीं भला । असे जो झोंपला । स्वस्थपणें ॥१२७॥
जयाचें मानस । होई च ना जागें । झगडता अंगें । सुखदुःख ॥१२८॥
विषय समीप । आले तरी जाण । काय हें म्हणोन । ओळखेना ॥१२९॥
इद्रियें तीं सर्व । आपुले व्यापार । जरी निरंतर । चालविती ॥१३०॥
तरी फल हेतू–। लागीं सर्वथैव । अंतरीं जो हांव । बाळगीना ॥१३१॥
असोनियां *देही । देहीं उदासीन । निद्रितासमान । जागृतींत ॥१३२॥
तो चि पार्था सिद्ध । भला योगारूढ । ऐसे हें उघड । ओळख तूं ॥१३३॥

---

*परिशिष्ट पहा.　१ ह्या बाजूचा.　२ योगरूपी पर्वताचा.　३ पूर्ण होते.　४ ऐक्यामुळें.　५ राहतें; थांबतें.

पार्थ म्हणे देवा । ऐकोनि हे बोल । वाटतें नवल । मज मोठें ।।१३४।।
तया योगारूढा । ऐसें थोरपण । देई तरी कोण । सांगें आतां ।।१३५।।

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन: ।।५।।

तंव हांसोनियां । म्हणे नारायण । काय विलक्षण । बोलणें हें ।।१३६।।
पार्था पाहें येथें । अद्वैताच्या ठायीं । द्यावें तरी काई । कोणीं कोणा ? ।।१३७।।
दृढ अविद्येनें । भ्रांतिशय्येवरी । जीव देहधारी । झोंपे जेव्हां ।।१३८।।
तेव्हां झोंपेमाजीं । भोगीतसे साचें । जन्म-मरणाचें । दुष्ट स्वप्न ।।१३९।।
ज्ञानाची जागृति । येतां अकस्मात । स्वप्न तें लोपत । आघवें चि ।।१४०।।
ऐशा रीती मग । सर्वथा जी सत्य । [1]अनुभूति नित्य । अस्तित्वाची ।।१४१।।
धनंजया ती हि । स्वभावतां येई । आपुल्या चि ठायीं । आपणासी ।।१४२।।
म्हणोनियां मिथ्या । देहाभिमानातें । साच ऐसें चित्तें । मानोनियां ।।१४३।।
आपुला आपण । जीव कैसा पाहीं । करोनियां घेई । घात येथें ।।१४४।।

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जित: ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ।।६।।

करोनि विचार । सोडावी अहंता । व्हावें पंडुसुता । [2] सत्स्वरूप ।।१४५।।
तरी मग तेणें । आपुलें कल्याण । साधिलें आपण । ऐसें होय ।।१४६।।
परी देह साच । मानोनियां [3] रम्य । तेथें चि [4]तादात्म्य । पावला जो ।।१४७।।
जाण पार्था *कोष–। कीटकाच्या परी । आपुला चि वैरी । आपण तो ।।१४८।।
करंट्यासी कैसे । प्राप्तीचिया वेळे । लागती डोहाळे । अंधत्वाचे ।।१४९।।
असते नयन । घेतसे झाकोन । [5]मुके तो म्हणोन । वस्तुलाभा ।।१५०।।
किंवा कोणी जैसा । भ्रमामाजीं साच । म्हणे माझा मी च । हरवलों ।।१५१।।
नसतें चि वेड । घेवोनियां दृढ । कैसा राहे मूढ । होवोनियां ।।१५२।।
एऱ्हवीं तो साच । पूर्वींचा च आहे । परी बुद्धि नोहे ।। तैसी त्याची ! ।।१५३।।
देखें स्वप्नामाजीं । लागोनियां घाय । मरेल कीं काय । कोणी साच ।।१५४।।

---

१ अनुभव. २ खरें स्वरूप. ३ गोड; सुंदर. ४ एकरूप झाला. ५ चुकतो.

टांगली *नलिका । उलट ती फिरे । जैसी अंगभारें । *पोपटाच्या ॥१५५॥
तेव्हां तेणें जावें । उडोनियां देखा । परी मनीं शंका । बाळगोनि ॥१५६॥
वायां मान पिळी । हृदय आंवळी । धरोनि ती नळी । चवड्यांत ॥१५७॥
श्रमोनियां म्हणे । बांधलों मी स्पष्ट । न सांपडे वाट । सुटावया ॥१५८॥
ऐशा कल्पनेच्या । खोड्यामाजीं पडे । मोकळे चवडे । [1]गोंवी घट्ट ॥१५९॥
मग जरी अर्धा । तोडिला तयासी । तरी नलिकेसी । सोडी ना तो ॥१६०॥
ऐसा [2]काजेंवीण । गुंतला आपण । तया दुजें कोण । बांधी काय ? ॥१६१॥
म्हणोनि संकल्प । जेणें वाढविला । वैरी तो आपुला । आपण चि ॥१६२॥
देव म्हणे दुजा । तो चि आत्मज्ञानी । कीं तो मिथ्या मानी । देहालागीं ॥१६३॥

जितात्मन: प्रशान्तस्य परमात्मा समाहित: ।
शीतोष्णसुखदु:खेषु तथा मानापमानयो: ॥७॥
ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रिय: ।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चन: ॥८॥

झालीं मनोबुद्धि । तयाचीं स्वाधीन । वासना [3]निमोन । गेल्या सर्व ॥१६४॥
म्हणोनि तयासी । परमात्मा पाहीं । दूर कोठें नाहीं । पलीकडे ॥१६५॥
टाकितां काढोन । सोन्यांतील हीण । उत्तम सुवर्ण । तें चि होय ॥१६६॥
तैशापरी पार्था । लोपतां संकल्प । जीव ब्रह्मरूप । स्वभावें चि ॥१६७॥
घटाचा आकार । नाहींसा होतां च । तयांतील साच । आकाश जें ॥१६८॥
तया महाकाशीं । जैसें मिळायास । न लागे जायास । दुज्या ठायीं ॥१६९॥
तैसी मिथ्या *देह–। अहंता सकळ । जयाची समूळ । नष्ट झाली ॥१७०॥
परब्रह्मरूप । तो तरी आधींच । भरलासे साच । सर्वां ठायीं ॥१७१॥
पार्था पाहें सूर्य । जया मार्गें जाय । विश्व तेजोमय । तेवढें तें ॥१७२॥
तैसें ज्ञानियासी । जें जें पावे तें तें । आत्मरूप होतें । म्हणोनियां ॥१७३॥
तया कैचें आतां । शीत किंवा उष्ण । मान-अपमान । सुख-दु:ख ॥१७४॥
मेघापासोनियां । पर्जन्याच्या धारा । पातल्या सागरा । [4]खोंचतीना ॥१७५॥

---

*परिशिष्ट पहा. १ गुंतवितो. २ कारणाशिवाय; उगाचच. ३ नाहींशा होऊन. ४ खुपत नाहीं.

शुभाशुभें तैसीं । वाटती ना भिन्न । आत्मरूपाहून । [१] योगेशातें ॥१७६॥
करितां विचार । सांसारिक भाव । तयालागीं सर्व । मिथ्या झाला ॥१७७॥
मग पाहूं लागे । तंव जें का ज्ञान । तें चि तो होवोन । ठाके पार्था ॥१७८॥
अद्वैतीं व्यापक । किंवा एकदेशी । थांबे चर्चा ऐसी । आपोआप ॥१७९॥
जिंकिलीं इंद्रियें । जयें कोणी येथें । कौतुकें तयातें । तोलूं जातां ॥१८०॥
तो चि परब्रह्म–। तुल्य वाटे भला । पार्था जरी झाला । देहधारी ॥१८१॥
जितेंद्रिय योगी । स्वभावें तो जाण । नेणे थोर सान । कदा काळीं ॥१८२॥
पार्था पाहें मेरू–। एवढा विशाळ । पर्वत निर्मळ । सुवर्णाचा ॥१८३॥
आणि एवढेंसें । मातीचें ढेकूळ । तया तीं केवळ । सारखीं च ॥१८४॥
पृथ्वीचें हि मोल । पाहतां [२] थोकडें । ऐसें रत्न जोडे । बहुमोल ॥१८५॥
तरी तें हि मानी । पाषाणासमान । ऐशापरी जाण । निरिच्छ तो ॥१८६॥

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु ।
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥९॥

तेथ कोण शत्रु । आणि कोण आप्त । कोण तिऱ्हाईत । कोण मित्र ? ॥१८७॥
तयाचिया ठायीं । ऐशा भिन्न वृत्ति । काय [३]कल्पूं येती । धनंजया ॥१८८॥
मी च विश्व ऐसा । बोध होतां साचा । कोण बंधु कैंचा । कोण वैरी ॥१८९॥
मग तयाचिया । दृष्टीलागीं जाण । दिसेल का हीन–। श्रेष्ठ कोणी ॥१९०॥
हेम परिसाच्या । लागे कसोटीस । मग भिन्न कस । कोठोनियां ॥१९१॥
कसोटी ती करी । निर्दोष सुवर्ण । तैशापरी जाण । धनंजया ॥१९२॥
चराचरीं नित्य । [४]साम्याचा उदय । तयाचिया होय । बुद्धीलागीं ॥१९३॥
कां जीं विश्वांतील । प्राणिगणरूप । भूषणें अमूप । नानाकृति ॥१९४॥
एक चि त्या ब्रह्म–। रूप सुवर्णाचीं । घडलीं तीं साचीं । सर्वथैव ॥१९५॥
बरवें हें ज्ञान । ऐसें धनंजया । आलें तयाचिया । प्रत्ययासी ॥१९६॥
म्हणोनि बाहेर । विश्वीं नानाकार । भासतां साचार । फसे ना तो ॥१९७॥
पाहूं जातां वस्त्र । तंतुमय जाण । तेथें त्यावांचोन । दुजें नाहीं ॥१९८॥

---

१ योग आत्मसात् केलेल्याला.   २ थोडें.   ३ मानतां येतील.   ४ समान अशा आत्मतत्त्वाचा.

*तंतु-पट-न्यायें । विश्वीं एकत्वाचा । अनुभव साचा । जयालागीं ॥१९९॥
तो चि समबुद्धि । ऐसें जाण पार्था । बोल हा [१]अन्यथा । नको मानूं ॥२००॥
जयाचें दर्शन । समाधाना ठाव । जयालागीं नांव । तीर्थराज ॥२०१॥
जयाच्या संगतीं । [२]भ्रांतमतीतें हि । अनायासें होई । ब्रह्मप्राप्ति ॥२०२॥
जयाचिया बोलें । धर्म जगे देख । स्वर्गसुखादिक । खेळ ज्याचा ॥२०३॥
आणि कृपादृष्टि । जयाची होतांच । *महा-सिद्धि साच । प्राप्त होती ॥२०४॥
जयाचें स्मरण । स्वभावें चि होतां । आपुली योग्यता । देई जो का ॥२०५॥
बहु बोलूं काय । तयाचें स्तवन । होय तें पावन । लाभदायी ॥२०६॥

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थित: ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह: ॥१०॥

मावळे ना ऐसा । अद्वैताचा दिन । उगवला जाण । जयालागीं ॥२०७॥
मग तो आपण । आपुल्या चि ठायीं । जडोनियां राही । अखंडित ॥२०८॥
ऐशा [३] आत्मदृष्टी । विवेकी जो झाला । पार्था तो एकला । एक असे ॥२०९॥
आतां तिन्ही लोकीं । तो चि तो म्हणोन । [४]असंग्रही जाण । स्वभावतां ॥२१०॥
सिद्धाचीं लक्षणें । ऐसीं विलक्षण । प्रेमें बहरोन । देव बोले ॥२११॥
देखा [५]द्रष्ट्यांच्या हि । दृष्टीचा जो दीप । ज्ञानियांचा बाप । असे जो का ॥२१२॥
जयाच्या संकल्पें । विश्वाची रचना । होय, ऐसा जाणा । समर्थ जो ॥२१३॥
ॐकाराच्या पेठे–। माजीं शब्दब्रह्म । झालें जें उत्तम । महावस्त्र ॥२१४॥
होय तें हि टांचें । ज्याचिया यशातें । देखा वेढायातें । पुरे चि ना ॥२१५॥
चंद्र-सूर्यालागीं । प्रतिष्ठा सहजें । लाभे मूळ तेजें । जयाचिया ॥२१६॥
चराचरासी ह्या । म्हणोनियां कोण । दुजा तयाविण । प्रकाशक ॥२१७॥
अहो जयाचिया । नामाचिया पुढें । गगन हि पडे । तोकडेंच ॥२१८॥
तयाचे एकैक । गुण अद्वितीय । कोणीं कैसे काय । आकळावे ॥२१९॥
म्हणोनियां असो । सर्वथा हें आतां । प्रभु कृष्णनाथा । किती वानूं ! ॥२२०॥
वानूं नेणें देवें । बोलिलीं लक्षणें । कोणाचीं कां येणें । मिषें येथें ॥२२१॥

---

*परिशिष्ट पहा. १ खोटा. २ भ्रमिष्टाला हि. ३ आत्मदृष्टीनें. ४ संग्रह न करणारा.
५ साक्षात्कारी पुरुषांच्या.

जरी ब्रह्मविद्या । करावी उघडी । समूळ जी [१]फेडी । *द्वैतभाव ॥२२२॥
तरी देवालागीं । पार्थाची आवडी । नासेल ना गोडी । अद्वैतीं ती ॥२२३॥
म्हणोनियां पार्था । तूं चि ब्रह्म ऐसें । नाहीं हृषीकेशें । स्पष्ट केलें ॥२२४॥
ऐशापरी आड । पडदा ठेवोन । अद्वैत-वर्णन । करी देव ॥२२५॥
भोगावया देव–। भक्त-प्रेमसुख । मनें वेगळीक । असावी कीं ॥२२६॥
मोक्ष-सुखालागीं । जाहला जो दीन । अटक ठेवोन । सोऽहं-भाव ॥२२७॥
तयाच्या दृष्टीचा । न लागो काळिमा । पार्थाचिया प्रेमा । म्हणोनियां ॥२२८॥
अहंभाव ह्याचा । जरी का जाईल । आणि हा होईल । मत्स्वरूप ॥२२९॥
तरी मी एकाकी । काय करूं येथें । मनीं ऐसें वाटे । श्रीकृष्णातें ॥२३०॥
जयातें पाहोन । व्हावें समाधान । करावें भाषण । तोंडभरी ॥२३१॥
जयालागीं द्यावें । दृढ अलिंगन । ऐसें मग कोण । उरे दुजें ॥२३२॥
आपुलिया जीवीं । जी का सामावे ना । वाटे जी का मना । भली गोष्ट ॥२३३॥
कवणासी मग । सांगावी ती येथें । पावला ऐक्यातें । जरी पार्थ ॥२३४॥
ऐसी [२]काकुळती । आपुली आपण । सर्वथा जाणून । जनार्दनें ॥२३५॥
[३]अन्योपदेशाची । रीति स्वीकारून । [४]बोलीं मनें मन । आलिंगिलें ॥२३६॥
ओतीव ती मूर्ति । कृष्ण-सुखाची च । पार्थरूपें साच । प्रकटली ॥२३७॥
ऐकतां हें वाटे । जरी अवघड । जाणा कीं निवाड । ऐसा चि हा ॥२३८॥
वांझेसी वार्धक्यीं । एक चि संतान । तेणें आनंदोन । नाचे मोहें ॥२३९॥
झाली अनंताची । तैसीच अवस्था । देखोनियां पार्था । तिये वेळीं ॥२४०॥
न होता तल्लीन । देव पार्थ-प्रेमीं । तरी ऐसें हें मी । बोलतों ना ॥२४१॥
पार्थावरी कैसें । प्रेम विलक्षण । कोठें आत्मज्ञान । कोठें युद्ध ॥२४२॥
प्रीतिपात्रापुढें । जणूं प्रेममूर्ति । पहा तो श्रीपति । नाचे कैसा ! ॥२४३॥
सांगा प्रेम जरी । उपजवी लाज । तरी तें [५]निर्व्याज । प्रेम काय ॥२४४॥
तेवीं चि व्यसनें । जरी वाटे शीण । तरी तें व्यसन । म्हणों ये का ॥२४५॥
वेड जें टाकी ना । जीवा भुलवोन । वेड म्हणे कोण । तयालागीं ॥२४६॥

---

*परिशिष्ट पहा. १ नाहींसा करते. २ कींव; दया. ३ अन्योक्तीची. ४ बोलण्यांत. ५ निर्दोष; सरळ.

तरी धनंजय । [1] सख्यत्वा आश्रय । हा चि अभिप्राय । जाणा येथें ।।२४७।।
सुखें शृंगारिलें । किंवा जें मानस । पहावया त्यास । आरसा तो ।।२४८।।
धन्य पुण्यवंत । ऐसा धनंजय । पावन तो होय । जगामाजीं ।।२४९।।
भक्तिबीजालागीं । पेराया [2] सुक्षेत्र । म्हणोनि तो पात्र । कृष्णकृपे ।।२५०।।
*आत्मनिवेदना-। अलीकडे देखा । * सख्याची भूमिका । जी का दृढ ।।२५१।।
सख्य-भक्तीची त्या । कैसा धनंजय । [3] अधिष्ठात्री होय । देवता तो ।।२५२।।
पासीं प्रभु तरी । न वर्णितां त्यासी । येथें सेवकासी । वाखाणावें ।।२५३।।
थोर पात्रतेचा । ऐसा धनंजय । स्वभावें तो प्रिय । देवालागीं ।।२५४।।
प्रियोत्तमा मान्य । होय जी का नारी । पतिसेवा करी । आवडीनें ।।२५५।।
पतिहूनि ती च । पतिव्रता जगीं । वर्णावयाजोगी । नव्हे काय ।।२५६।।
पार्थ चि तो तैसा । विशेषें वानावा । हेंचि माझ्या जीवा । आवडलें ।।२५७।।
कीं जें त्रैलोक्याचें । सर्वथा सुदैव । तया झाला ठाव । हा चि एक ।।२५८।।
जरी निराकार । स्वयंपूर्ण साचा । तरी अर्जुनाचा । [4]वेध तया ।।२५९।।
पार्थाचिया ठायीं । प्रेम अनिवार । म्हणोनि साकार । झाला देव ।।२६०।।
बोलाचा हा [5]ढंग । पाहोनियां श्रोते । तेव्हां बोलती ते । थोर भाग्य ! ।।२६१।।
जिंकोनियां आलें । नादब्रह्म काय । शब्दांचें सौंदर्य । ऐसें वाटे ।।२६२।।
नवल ना देशी । मराठी ही भाषा । परी कैसी यशा । आली येथें ।।२६३।।
साहित्य-रंगाचे । नानाविध ठसे । शब्दाकाशीं कैसे । उमटले ।।२६४।।
कैसें ज्ञानरूप । चांदणें टपोर । शीतल साचार । भावार्थें जें ।।२६५।।
कैसी श्लोकार्थाची । कुमुदिनी येथ । झाली विकसित । स्वभावें चि ।।२६६।।
निरिच्छ जे येथें । तयांतें हि व्हावी । इच्छा कीं ऐकावी । कथा ही च ।।२६७।।
मनोरथाची ह्या । थोरवी ही साच । अंतरीं येतां च । प्रत्ययासी ।।२६८।।
मग उत्कंठेनें । ऐकतां हे बोल । सुखें आला डोल । श्रोत्यांलागीं ।।२६९।।
तंव ज्ञानदेव । सर्व हें जाणोन । म्हणे अवधान । द्यावें आतां ।।२७०।।
पांडवांच्या कुळीं । उजाडलें पूर्ण । कृष्णरूप दिन । उगवतां ।।२७१।।

---

*परिशिष्ट पहा. १ मैत्रीला. २ सुपीक जमीन. ३ आधारभूत; मुख्य. ४ ओढ. ५ तऱ्हा; ऐट; रीत.

देवकीमातेनें । उदरीं वाहिला । सायासें पाळिला । यशोदेनें ॥२७२॥
नवल हें परी । झाला तो श्रीहरी । शेवटीं [1] कैवारी । पांडवांचा ॥२७३॥
म्हणोनि सेवावा । यत्नें बहु दिन । प्रसंग पाहोन । विनवावा ॥२७४॥
ऐसा हि सायास । पडे चि ना आतां । तया भाग्यवंता । अर्जुनासी ॥२७५॥
तंव श्रोतेजन । बोलती राहो हें । कथा [2] लवलाहें । सांगें आतां ॥२७६॥
मग म्हणे पार्थ । लडिवाळपणें । देवा हीं लक्षणें । संतांचीं जीं ॥२७७॥
सांगितलीं तुम्हीं । सर्वथा तीं पाहीं । वसती ना कांहीं । माझ्या अंगीं ॥२७८॥
देवा पाहतां ह्या । लक्षणांचें सार । खरोखरी फार । अपुरा मी ॥२७९॥
परी तुम्ही मातें । जरी शिकवाल । योग्यता येईल । तरी अंगीं ॥२८०॥
जरी माझ्याकडे । पुरवाल चित्त । ब्रह्म चि निश्चित । होईन मी ॥२८१॥
सांगाल अभ्यास । तो तो करायास । का मज सायास । वाटतील ॥२८२॥
देवा तुम्हीं गोष्ट । सांगितली जी ही । कोणाची तें कांहीं । आकळे ना ॥२८३॥
परी ऐकोनि हि । तीतें स्तवावें च । ऐसें मनीं साच । वाटतसे ॥२८४॥
मग झाले सिद्ध । होतां ब्रह्मप्राप्ति । तयांची [3] महती । केवढी ती ! ॥२८५॥
अंतरीं उत्कंठा । लागली म्हणोनि । प्रभो विनवणी । ही च आतां ॥२८६॥
आपुला मानोनि । ऐसें चि करावें । कीं म्यां [4] स्वयें व्हावें । ब्रह्मरूप ॥२८७॥
पार्थाचें वचन । ऐकोनि भगवान् । बोलती हांसोन । करूं ऐसें ॥२८८॥
नाहीं समाधान । लाधलें निर्मळ । सुखाचा दुष्काळ । तोंवरी च ॥२८९॥
देखा सुदैवें तें । लाभतां संपूर्ण । मग राहे [5] न्यून । कोठें काय ॥२९०॥
तैसा सर्वेश्वर । समर्थ जो साचा । तयासी पार्थाचा । लागे छंद ॥२९१॥
म्हणोनि तो पार्थ । ब्रह्म हि होईल । कायसें नवल । असे येथें ? ॥२९२॥
परी पिका आलें । भाग्य तें म्हणोन । पहा ओथंबून । आला कैसा ! ॥२९३॥
घेवोनियां जन्म । सहस्र हि देखा । होय इंद्रादिकां । दुर्लभ जो ॥२९४॥
तो चि येथें कैसा । पार्थाच्या आधीन । बोल ते झेलोन । धरी त्याचे ॥२९५॥
बोलिलें जें पार्थें । स्वयें ब्रह्म व्हावें । ऐकिलें तें देवें । संपूर्णत्वें ॥२९६॥

---

१ साह्यकर्ता; पाठीराखा. २ सत्वर. ३ थोरवी. ४ स्वत: ५ उणीव.

D:\Dyaneshwari_2007\ADA6_116-158....128

मग मनीं म्हणे । पार्थालागीं भले । लागले डोहळे । ब्रह्मत्वाचे ॥२९७॥
बुद्धीचिया पोटीं । विरक्तता आली । म्हणोनि जवळी । ब्रह्मप्राप्ति ॥२९८॥
अपूर्ण ते दिन । तरी पाहूं जातां । वैराग्य-वसंता । भर आला ॥२९९॥
म्हणोनि हा पार्थ । अहंब्रह्मरूप । मोहोरें [1]अमूप । ओथंबला ॥३००॥
ब्रह्मप्राप्तिरूप । फळें यावयास । आतां नको ह्यास । फार काळ ॥३०१॥
झाला हा विरक्त । सर्वथैव ऐसा । आला भरंवसा । अनंतासी ॥३०२॥
म्हणे जें जें कांहीं । आतां अनुष्ठील । सिद्ध तें होईल । आरंभींच ॥३०३॥
म्हणोनि अभ्यास । सांगितला ह्यास । येईल यशास । सहजें चि ॥३०४॥
ऐसा दूरवरी । करोनि विचार । म्हणे योगेश्वर । अर्जुनातें ॥३०५॥
सर्व मार्गांमध्यें । असे जो का श्रेष्ठ । तो चि ऐकें येथ । योगमार्ग ॥३०६॥
*प्रवृत्तिवृक्षाच्या । तळीं जेथें साचीं । फळें निवृत्तीचीं । कोट्यवधि ॥३०७॥
असे चि अद्यापि । शंभु महेश्वर । यात्रेकरू थोर । मार्गाचा ज्या ॥३०८॥
योग्यांचा समुदाय । निघाला [2]सवेग । आडमार्गें मग । *शून्यामाजीं ॥३०९॥
स्वानुभवाचिया । पाउलीं चालतां । आली सुलभता । मार्गासी ज्या ॥३१०॥
अज्ञानाचे मार्ग । सकळ सांडोनि । तया योगियांनीं । [3]एकसरें ॥३११॥
आत्मबोध उजू । मार्ग स्वीकारोनि । धांव *महाशून्यीं । घेतली गा ॥३१२॥
ह्या चि मार्गें मग । महर्षी हि आले । साधक ते झाले । *सिद्धराज ॥३१३॥
पावले श्रेष्ठत्व । आत्मज्ञ हि येथें । आले ह्या चि पंथें । म्हणोनियां ॥३१४॥
नाठवे ती भूक । नाठवे तहान । घडतां दर्शन । मार्गाचें ह्या ॥३१५॥
आक्रमितां मार्ग । रात्र कीं हा दिन । राहे ना हें भान । साधकातें ॥३१६॥
चालतां पाऊल । जेथें जेथें पडे । मोक्षाची उघडे । खाण तेथें ॥३१७॥
आणि आडमार्गें । साधक तो गेला । तरी लाभे त्याला । स्वर्गसुख ॥३१८॥
पूर्वेचिया मार्गें । पश्चिमेचा तट । गांठावा, उलट । पंथ ऐसा ॥३१९॥
निश्चळपणें चि । चालणें येथींचें । देखें असे साचें । [4]विलक्षण ॥३२०॥
जाण येणें मार्गें । जया स्थानीं जावें । तें तों स्थान व्हावें । आपण चि ॥३२१॥

---

*परिशिष्ट पहा.　१ पुष्कळ.　वेगानें.　३ एकदम.　४ वेगळ्याच प्रकारचें.

थोरवी ही ऐसी । किती सांगूं आतां । स्वभावें तूं पार्था । जाणशील ।।३२२।।
पार्थ म्हणे तेव्हां । कृपानिधे देवा । तें चि मग केव्हां । जाणेन मी ।।३२३।।
उत्कंठा-सागरीं । बुडालों मी येथें । कां न काढा मातें । वरी तुम्ही ।।३२४।।
तंव तया ऐसें । बोलती श्रीकृष्ण । काय हें भाषण । [1]उच्छृंखळ ।।३२५।।
आम्ही स्वेच्छेनेंच । सांगतसों साच । वरी तूं हि तें च । विचारिसी ।।३२६।।

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मन: ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ।।११।।

तरी पार्था आतां । ऐक सविस्तर । सांगतों साचार । योगमार्ग ।।३२७।।
परी अभ्यासोनि । घ्यावा अनुभव । तरी च तें सर्व । सार्थ होय ।।३२८।।
ह्या चि लागीं तैसें । सुयोग्य बरवें । लागेल पहावें । स्थान एक ।।३२९।।
मन:शांतीसाठीं । घालितां आसन । [2]नुठावें जेथून । ऐसें वाटे ।।३३०।।
देखोनि जें वाढे । वैराग्य [3]द्विगुणें । जें कां संतजनें । वसविलें ।।३३१।।
जेथें संतोषासी । लाभतें सहाय्य । जेथें मनोधैर्य । उल्हासतें ।।३३२।।
जेथें अनायासें । घडे योगाभ्यास । [4]लाधे साधकास । * स्वानुभूति ।।३३३।।
ऐसी रम्यतेची । थोरवी साचार । असे निरंतर । जया स्थानीं ।।३३४।।
पाहें [5]पाखांडी जो । तयाचें हि मन । पाहोनि तें स्थान । वेध घेई ।।३३५।।
तया हि तेथें चि । आचरावें तप । ऐसी आपोआप । इच्छा होय ।।३३६।।
हिंडतां सहज । कोणी अकस्मात् । जरी झाला प्राप्त । तया स्थानीं ।।३३७।।
असो कामुक हि । तरी तेथोनियां । मागें परताया । विसरे तो ।।३३८।।
न राहता तरी । तया हि राहवी । तेंवी चि बैसवी । हिंडत्यातें ।।३३९।।
झोंपलें वैराग्य । तरी थापटोनि । जागृतीसी आणी । तयासी जें ।।३४०।।
विलासी जे होती । तयांतें हि साच । पाहतांक्षणींच । ऐसें वाटे ।।३४१।।
राज्य तरी तें हि । सोडोनियां द्यावें । येथें चि रहावें । स्वस्थपणें ।।३४२।।
ऐसें जें सुंदर । [6]पावन उत्तम । जेथें भेटे ब्रह्म । मूर्तिमंत ।।३४३।।
पहावें तैसें च । आणिक हि एक । राहती साधक । जया स्थानीं ।।३४४।।

---

१ उतावळें. २ उठूं नये. ३ दुपटींने. ४ लाभते. ५ नास्तिक. ६ पवित्र.

आणि जे का होती । सामान्य सकळ । तयांची [1] वर्दळ । नसे जेथें ।।३४५।।
अमृतासमान । गोड जीं समूळ । दाट झाडें फळ–। युक्त जेथें ।।३४६।।
वर्षाकाळ तरी । अत्यंत निर्मळ । विशेष जें जळ । [2] निर्झरांचें ।।३४७।।
तें चि जया स्थानीं । पाउलागणिक । आढळे गा देख । अनायासें ।।३४८।।
ऊन तें हि जेथें । सौम्य भासताहे । मंद वारा वाहे । शांतपणें ।।३४९।।
जेथें एकाएकीं । रिघेना श्वापद । शुक वा [3] षट्पद । [4] नाढळती ।।३५०।।
बहुधा नि:शब्द । असावें तें स्थळ । बैसला कोकिळ । बसो तेथें ।।३५१।।
जळाश्रयें हंस । असोत त्या ठायीं । चार दोन पाहीं । चक्रवाक ।।३५२।।
मध्यंतरीं मोर । आले गेले कांहीं । आमुची ना नाहीं । तयालागीं ।।३५३।।
परी योगाभ्यासा । ऐसें चि ठिकाण । आवश्यक जाण । पंडुसुता ।।३५४।।
मग गूढ मठ । किंवा शिवालय । मानलें जें होय । चित्तालागीं ।।३५५।।
दोहोंतील एक । कोणतें हि घ्यावें । तेथें चि बैसावें । एकांतांत ।।३५६।।
पाहोनि जें स्थान । स्थिरावेल मन । तेथें चि आसन । रचावें गा ।।३५७।।
वरी [5] मृगाजिन । माजीं धूतवस्त्र । तळवटीं साग्र । दर्भांकुर ।।३५८।।
सारिखे सुबद्ध । असावे कोमल । कीं जे राहतील । [6] एकपाडें ।।३५९।।
परी जरी होय । आसन तें उंच । तरी अंग साच । कलंडेल ।।३६०।।
तेविं होय जरी । सहजें सखल । तरी बाधतील । भूमिदोष ।।३६१।।
म्हणोनियां तैसें । करावें ना कांहीं । धरावें तें पाहीं । समभाग ।।३६२।।
आसन तें ऐसें । असावें साचार । पुरे हा विस्तार । येथें आतां ।।३६३।।

तत्रैकाग्रं मन: कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रिय: ।
उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ।।१२।।

तरी ऐसें स्थान । पाहोनियां तेथें । मग स्वस्थचित्तें । धनंजया ।।३६४।।
घ्यावा अनुभव । योगाचा संपूर्ण । करोनि स्मरण । सद्गुरूचें ।।३६५।।
सद्गुरु सादर । आठवतां चित्तीं । भरे सत्त्ववृत्ति । अंतर्बाह्य ।।३६६।।
अहं-भावनेची । विरे कठिणता । स्फुरे स्वभावतां । *सोऽहंभाव ।।३६७।।

---

१ येजा.　२ झऱ्यांचें.　३ भुंगे.　४ आढळत नाहींत.　५ हरणाचें कातडें.　६ एका पातळींत.

तेणें विषयांचा । पडोनि विसर । जिरे सर्व जोर । इंद्रियांचा ।।३६८।।
अंतरीं रिघोन । स्थिरावे तें मन । ऐसें ऐक्य पूर्ण । प्राप्त होय ।।३६९।।
तोंवरी तैसें चि । करावें स्मरण । तेथें चि राहोन । साधकानें ।।३७०।।
त्या चि ऐक्यतेच्या । बोधें मग तेणें । आसनीं बैसणें । स्वस्थ-चित्तें ।।३७१।।
आतां अंग चि तें । सांवरी अंगातें । धरी पवनातें । पवन तो ।।३७२।।
ऐसा अनुभव । पावे उत्कर्षातें । बैसतां चि तेथें । आसनीं त्या ।।३७३।।
[१] प्रवृत्तीची धांव । वळोनि माघारी । येई ऐल तीरीं । समाधि ती ।।३७४।।
सर्व हि अभ्यास । पूर्ण होतो साच । बैसतांक्षणीं च । आपोआप ।।३७५।।
*मुद्रेचें महत्त्व । ऐसें चि तें आतां । ऐक पंडुसुता । सांगेन मी ।।३७६।।
पोटऱ्या मांडीसी । ठेवाव्या जडोनि । वांकडे करोनि । तळपाय ।।३७७।।
*आधारचक्राच्या । बुडाशीं सुस्थिर । लावावे साचार । बळकट ।।३७८।।
टांचेनें शिवण । धरावी दाबून । तळीं [२] नेहटून । [३] सव्य पाय ।।३७९।।
सव्य पायावरी । मग डावा पाय । बैसता तो होय । स्वभावें चि ।।३८०।।
गुद आणि [४] शिश्न । ह्यांमाजीं साचार । जागा असे चार । अंगुळें जी ।।३८१।।
मागें पुढें दीड । सोडितां त्यांतील । मध्यें एकांगुळ । राहे जागा ।।३८२।।
सव्य टांचेनें ती । धरावी दाबून । तोल सांभाळून । शरीराचा ।।३८३।।
कळे नकळेसा । उचलावा चांग । [५] पृष्ठवंशभाग । शेवटील ।।३८४।।
दोन हि पायांचे । घोटे धरावेत । त्या चि प्रमाणांत । धनुर्धरा ।।३८५।।
मग सर्व देह । टांचेचिया माथां । राहतो सर्वथा । स्वयंसिद्ध ।।३८६।।
अर्जुना हा ऐसा । *मूळबंध जाण । *वज्रासन गौण । नाम ह्यासी ।।३८७।।
ऐसी *मूलाधारीं । मुद्रा पडे चांग । आणि अधोमार्ग । मोडे जेव्हां ।।३८८।।
तेव्हां तो अपान । आंतलिया अंगें । ओहटाया लागे । आपोआप ।।३८९।।

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ।।१३।।

तंव हस्तांजलि । द्रोणाकार झाली । सहजें बैसली । वाम-पदीं ।।३९०।।

---

१ इंद्रियांच्या विषयांकडील ओढीची. २ घट्ट रोवून. ३ उजवा. ४ (पुरुषांचे) जननेंद्रिय.
५ पाठीचा कणा. *परिशिष्ट पहा.

म्हणोनियां खांदे । दोन हि ते मग । उंचावले चांग । दिसे ऐसें ॥३९१॥
तयांमाजीं राहे । मस्तक तें घट्ट । होतां उभा ताठ । पृष्ठवंश ॥३९२॥
आणि कवाडें जीं । लोचनद्वाराचीं । पाहती तीं साचीं । बंद होवों ॥३९३॥
वरील पापण्या । ढळती त्या खालीं । खालील त्या तळीं । पसरती ॥३९४॥
म्हणोनियां पाहें । तेथें [1] अर्धमात्र । उघडले नेत्र । ऐसें दिसे ॥३९५॥
दृष्टि [2] अंतर्मुख । झाली ऐसी जरी । कौतुकें बाहेरी । पाहूं लागे ॥३९६॥
तरी स्वभावें ती । पडे नासाग्रींच । जडोनि तेथें च । राहे मग ॥३९७॥
स्थिरावली आंत । म्हणोनि साचार । मागुती बाहेर । पडे ना ती ॥३९८॥
दहा हि दिशांची । आतां घ्यावी भेट । पहावी कीं वाट । रूपाची त्या ॥३९९॥
पार्था ऐसी चाड । उरे चि ना कांहीं । सर्वथैव पाहीं । दृष्टीलागीं ॥४००॥
मग हनुवटी । दाटे खळगींत । होतां आकुंचित । [3] कंठनाळ ॥४०१॥
आणि दृढपणें । राहे नेहटून । सर्वथा ती जाण । वक्ष:स्थळीं ॥४०२॥
माजीं कंठमणि । लोपोनियां जाय । ऐसा बंध होय । *जालंधर ॥४०३॥
*स्वाधिष्ठानाचिया । वरील कांठाशीं । नाभिस्थानापाशीं । तळवटीं ॥४०४॥
बंध *ओढियाणा । पडतां चि जाण । फुगे नाभिस्थान । ऊर्ध्वभागीं ॥४०५॥
होवोनि सपाट । उदराचा प्रांत । फांके अंतरांत । हृदयकोश ॥४०६॥

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थित: ।
मन: संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्पर: ॥१४॥

बाहेर ही ऐसी । अभ्यासाची छाया । पडे धनंजया । देहावरी ॥४०७॥
तों चि आंत मनो–। धर्माचें सकळ । मोडतसे बळ । एकाएकीं ॥४०८॥
वासना [4] निमोन । प्रवृत्ति शमोन । अंगें विरे मन । स्वभावें चि ॥४०९॥
क्षुधा काय झाली । निद्रा कोठें गेली । स्मृति हि राहिली । नाहीं ह्याची ॥४१०॥
मूळबंधें जो का । कोंडला अपान । [5] मुरडे तो जाण । [5] ऊर्ध्वगती ॥४११॥
मुरडतां वरी । अडकोनि मग । सहजें चि फूग । धरीतसे ॥४१२॥
क्षोभला तो तेव्हां । होवोनियां मस्त । आवेशें गर्जत । राहे ठायीं ॥४१३॥

---

१ अर्धे; थोडेंसे.　२ आंत वळून पाहणारी.　३ गळ्याची नळी.　४ खुंटून;　५ वर वळतो.

मग तो तेथें च । राहोनियां स्थिर । * झुंजे * मणिपूर । चक्रासवें ।।४१४।।
ऐसी [१]वाहुटळ । बळावतां थोर । सकळ उदर । [२] शोधोनियां ।।४१५।।
बाळपणांतील । सांचली जी घाण । टाकितो काढून । बाहेरी ती ।।४१६।।
न सांपडे वाट । वळावया आंत । म्हणोनि कोठ्यांत । संचरे तो ।।४१७।।
करोनियां नष्ट । * कफ आणि *पित्त । ओलांडितो *सप्त–। धातु-स्थानें ।।४१८।।
[३] अस्थिगत *मज्जा । काढितो बाहेर । फोडितो डोंगर । * मेदाचे हि ।।४१९।।
विघडवी [४] गात्रें । सोडवी नाडीतें । ऐसा साधकातें । भेडसावी ।।४२०।।
परी त्या साधकें । सोडूं नये धीर । असावें खंबीर । अंतर्यामीं ।।४२१।।
नाना व्याधी दावी । सवें चि हारवी । एकत्र कालवी । आप-पृथ्वी ।।४२२।।
चालली खळाळ । ऐसी एकीकडे । तों चि काय घडे । दुजें देख ।।४२३।।
पार्था आसनाची । उष्णता लागोनि । शक्ति *कुंडलिनी । जागी होय ।।४२४।।
नागिणीचें पिलूं । कुंकुमें माखलें । घालोनि वेटाळें । झोंपे जैसें ।।४२५।।
तैसी कुंडलिनी । जणूं ती नागीण । अर्जुना होवोन । अधोमुख ।।४२६।।
घालोनि केवळ । वेढे साडेतीन । राहिली झोंपोन । भुकेली जी ।।४२७।।
ठेविली अग्नीची । ज्वाला दुमडोन । कीं जणूं कंकण । विजेचें तें ।।४२८।।
शुद्ध सुवर्णाचे । वेढे कीं घोटीव । ऐसी जी आटीव । कुंडलिनी ।।४२९।।
होती [५] नाभि-कंदीं । बैसली दाटोन । बंधयुक्त जाण । व्यवस्थित ।।४३०।।
होय कैसी पार्था । सावध ती आतां । चिमटोन जातां । वज्रासनें ।।४३१।।
जैसें का नक्षत्र । पडावें तुटोन । मोडावें आसन । सूर्याचें कीं ।।४३२।।
किंवा तेजोरूप । बीजासी साचार । फुटावा अंकुर । जिया परी ।।४३३।।
तैसी वेढ्यांलागीं । स्वभावें सोडीत । आळेपिळे देत । निजांगासी ।।४३४।।
शक्ति कुंडलिनी । दिसे ती साचार । नाभिकंदावर । उभी ठेली ।।४३५।।
बहुत दिसांची । आधीं च भुकेली । वरी जागी केली । चिमटोन ।।४३६।।
तेणें निमित्तें ती । मग [६] आवेशून । पसरी वदन । ऊर्ध्व उजू ।।४३७।।
हृदयकोशाचिया । खालतीं भरोन । राहे जो पवन । धनंजया ।।४३८।।

---

*परिशिष्ट पहा.　१ वादळ.　२ शुध्द करून.　३ हाडांतील.　४ अवयव.　५ बेंबीच्या मुळाशीं.　६ चिडून.

तया सकळ हि । पवनालागोन । दृढ आलिंगन । देवोनियां ।।४३९।।
मुखींच्या ज्वाळांनीं । खालीं वरी मग । घेई सर्व भाग । कवळोनि ।।४४०।।
मांसल जे ठाय । खाय ते कौतुकें । तोडोनि लचके । वरिवरी ।।४४१।।
मग असे देहीं । जें कांहीं [1] समांस । तयाचा चि घांस । घेऊं लागे ।।४४२।।
हृदयाचें स्थान । जें का तेथील हि । मग घांस घेई । एक दोन ।।४४३।।
शोधी तळपाय । शोधी तळहात । सर्वथा भेदीत । ऊर्ध्वभाग ।।४४४।।
ठायीं च राहोन । सांध्यासांध्यांतून । झाडा घेई पूर्ण । [2] प्रत्यंगाचा ।।४४५।।
न सोडी स्व-स्थान । तरी हि ती जाण । सत्त्व घे काढोन । नखाचें हि ।।४४६।।
धुवोनि त्वचेसी । मग ठेवी कैसी । [3] अस्थिपंजराशीं । जडोनियां ।।४४७।।
शिरांचे हि हीर । काढी ओरपून । घेई निरपून । अस्थिरस ।।४४८।।
तंव बाह्यभागीं । केसांचीं जीं मुळें । वाढणें खुंटलें । तयांचें हि ।।४४९।।
सात हि धातूंच्या । सागराचे घोट । घेई घटाघट । तृषार्त ती ।।४५०।।
पार्था ऐशा रीती । शरीर संपूर्ण । टाकी तापवोन । लगोलग ।।४५१।।
नासापुटांतून । वाहतसे वारा । अंगुळें जो बारा । धनुर्धरा ।।४५२।।
तयालागीं घट्ट । धरोनिया आंत । ओढिते ती तेथ । राहोनियां ।।४५३।।
अपान तो पावे । वरी आकुंचन । प्राण तो वरोन । खचे खालीं ।।४५४।।
आतां तयांचिया । [4] मीलनीं साचार । उरती पदर । * षट्चक्रांचे ।।४५५।।
नाहीं तरी तयां । दोहोंची हि भेट । व्हावयाची तेथ । त्या चि वेळीं ।।४५६।।
परी क्षणभरी । क्षुब्ध कुंडलिनी । तयां नोळखोनि । काय बोले ।।४५७।।
म्हणे तुम्ही कोण । आलांत कां येथें । चला व्हा चालते । पलीकडे ।।४५८।।
ऐक पार्था धातु । [5] पार्थिव आघवी । खावोनि न ठेवी । शेष कांहीं ।।४५९।।
आणि जो जो अंश । पाण्याचा म्हणोन । चाटोन पुसोन । टाकी तो हि ।।४६०।।
ऐशा परी तेथें । महाभूतें दोन । खावोनियां पूर्ण । तृप्त होतां ।।४६१।।
शक्ति कुंडलिनी । पहा राहे कैसी । सुषुम्नेच्यापाशीं । सौम्यपणें ।।४६२।।
पावोनियां तृप्ति । होतां समाधान । टाकी मुखांतून । गरळ जें ।।४६३।।

---

१ मांसयुक्त. २ प्रत्येक अवयवाचा. ३ हाडांच्या सांपळ्यांशीं. ४ एक होण्यांत.
५ मातीची; पृथ्वीतत्त्वाची.

त्या चि विषरूप । अमृताच्या योगें । धनंजया जगे । प्राणवायु ।।४६४।।
निघे मुखांतून । अग्नि मूर्तिमंत । परी करी शांत । अंतर्बाह्य ।।४६५।।
तिये वेळीं मग । गेलें बळ येतें । सर्व हि गात्रांतें । पुनरपि ।।४६६।।
थांबती व्यापार । *नऊ हि वायूंचे । वाहणें नाड्यांचें । बंद पडे ।।४६७।।
म्हणोनियां तेथें । स्वभावें सर्वथा । राहती ना पार्था । देह-धर्म ।।४६८।।
इडा-पिंगलांचें । होवोनि मीलन । सुटती संपूर्ण । *तिन्ही गांठी ।।४६९।।
आणि चक्रांचे ते । सहा हि पदर । फुटती साचार । धनुर्धरा ।।४७०।।
मग चंद्र सूर्य । ऐशीं काल्पनिक । नांवें देती देख । जयालागीं ।।४७१।।
तया पवनाचें । दिसे ना ठिकाण । प्रदीप लावोन । शोधितां हि ।।४७२।।
बुद्धीची कणिका । चैतन्यांत विरे । सुगंध जो उरे । घ्राणामाजीं ।।४७३।।
तो हि कुंडलिनी-। संगें पार्था पाहें । संचरोनि राहे । सुषुम्नेंत ।।४७४।।
तों चि [१]वरतोन । *चंद्रामृत-तळें । हळु कलंडलें । [२]शक्तिमुखीं ।।४७५।।
कुंडलिनीद्वारा । मग तें अमृत । पार्था सर्वांगांत । संचरे गा ।।४७६।।
आणि प्राणवायु । तो हि जाय साच । जागच्याजागीं च । मुरोनियां ।।४७७।।
तप्त होतां मूस । तयांतील मेण । जातसे निघून । जैशा रीती ।।४७८।।
मग धातुरस । जो का रसरशीत । राहे तो मुशींत । कोंदाटून ।।४७९।।
तैसी जणूं काय । त्वचेचा पदर । अर्जुना साचार । पांघरोनि ।।४८०।।
दिसे मूर्तिमंत । प्रकटली [३]कांति । धरोनि आकृति । शरीराची ।।४८१।।
किंवा सूर्यें घेतां । [४]मेघ-प्रावरण । प्रभा ती झांकोन । जाय जैसी ।।४८२।।
परि होतां दूर । [४]मेघाचें [५]पटल । प्रभेची झळाळ । धरों न ये ।।४८३।।
त्वचेचा वरील । शुष्क जो का भुसा । झडोनि तो तैसा । जातां मग ।।४८४।।
अंगकांतीची ती । दिसूं लागे झांक । जैसा का स्फटिक । मूर्तिमंत ।।४८५।।
किंवा रत्नरूप । बीजालागीं जाण । धुमारे फुटोन । आले जैसे ।।४८६।।
किंवा सायंकाळ । होतां चि गगन । करी उधळण । रंगांची ज्या ।।४८७।।
जणूं घेवोनियां । तयांचें साहाय्य । घडिलें कीं काय । शरीर तें ।।४८८।।

---

*परिशिष्ट पहा. १ वरिल बाजूनें. २ कुंडलिनीच्या मुखांत. ३ तेज. ४ ढगांचे पांघरुण. ५ पडदा.

आत्मप्रकाशाची । किंवा वाटे साच । शुद्ध प्रतिमा च । प्रकटली ।।४८९।।
ओतलें तें जैसें । चैतन्याच्या रसें । किंवा भरलेंसे । कुंकुमें चि ।।४९०।।
ना तरी ऐसें चि । वाटतें निभ्रांत । जणूं मूर्तिमंत । शांति च ती ।।४९१।।
नव्हे तें शरीर । रंग चि ते साचे । आनंद-चित्रांचे । ऐसें वाटे ।।४९२।।
आत्म-सुखाची ती । नातरी मूर्तीच । रोपटें कीं साच । संतोषाचें ।।४९३।।
ना तरी सुवर्ण-। चंपकाचा कळा । किंवा तो पुतळा । अमृताचा ।।४९४।।
ना तरी उद्यान । तरारलें पूर्ण । अर्जुना तें जाण । मार्दवाचें ।।४९५।।
शरदृतूंतील । पौर्णिमेच्या ओलें । कीं तें पालवलें । चंद्रबिंब ! ।।४९६।।
ना तरी ती वाटे । योगासनीं साच । मूर्ति तेजाची च । बैसलीसे ।।४९७।।
पडे चंद्रामृत । शक्तिमुखीं जेव्हां । शरीर तें तेव्हां । ऐसें होय ।।४९८।।
मग पाहोनि त्या । शरीराकृतीस । सहजें काळास । धाक वाटे ।।४९९।।
वार्धक्य मुरडे । तारुण्य हि मोडे । लोपली [१] उघडे । बाळ-दशा ।।५००।।
बाळ-दशा तरी । थोर पराक्रम । असे निरुपम । धैर्य तें हि ।।५०१।।
सुवर्णवृक्षाच्या । पालवीतें यावी । जैसी नित्य नवी । रत्नकळी ।।५०२।।
तैसीं नखें नवीं । निघती साचार । सतेज सुंदर । धनुर्धरा ।।५०३।।
दांत हि नवीन । तैसे चि ते येती । परी कैसे होती । अति सान ।।५०४।।
दोन हि बाजूंस । पार्था ऐसें भासे । जणूं बैसलीसे । रत्न-पंक्ति ।।५०५।।
सानुलीं माणिकें । कण्या तयांच्या हि । स्वभावें ज्या पाहीं । अणुतुल्य ।।५०६।।
तैसीं तीं [२] रोमाग्रें । सतेज सुंदर । सर्वांगीं साचार । उठावती ।।५०७।।
तेविं तळपाय । आणि करतळें । जैसीं [३] रातोत्पलें । तैसीं होती ।।५०८।।
आणि काय सांगूं । तयाच्या नेत्रांतें । निर्मळत्व येतें । निरूपम ।।५०९।।
पक्वदशेप्रति । पोहोंचतां मोतीं । न मावे संपुटीं । शिंपीचिया ।।५१०।।
मग शिंपीचा त्या । सांधा उकलोन । पडे मोतीं जाण । बाहेरी तें ।।५११।।
तैसी पापण्यांच्या । मावे ना [४] वेंगेंत । अर्ध-उन्मीलित । दृष्टि होय ।।५१२।।
जरी ऐसी दृष्टि । [५] अर्ध-उन्मीलित । तरी ती व्यापीत । गगनासी ।।५१३।।

---

१ स्पष्ट होते. २ केसांचीं टोंकें. ३ तांबडीं कमळें. ४ मिठींत. ५ अर्धी उघडलेली.

देह तरी होय । सुवर्णासारिखा । परी तो हलका । वायुतुल्य ॥५१४॥
कीं जे देहीं अंश । आप-पृथ्वीयेचे । नांव हि तयांचें । नुरे तेथें ॥५१५॥
मग सागराच्या । पैलाड हि देखे । विचार तो ऐके । स्वर्गांतील ॥५१६॥
आणि मुंगीचें हि । जें का मनोगत । तें तें हि समस्त । ओळखे तो ॥५१७॥
होय वायुरूप । वारूवरी स्वार । तेविं पाण्यावर । चालूं शके ॥५१८॥
चालूं शके तरी । पाण्याचा त्या स्पर्श । पाउलातें लेश–। मात्र नाहीं ! ॥५१९॥
प्रसंगानुसार । तयालागीं देख । लाभती अनेक । सिद्धि ऐशा ॥५२०॥
असो ऐकें पार्था । कुंडलिनी तेथ । प्राणाचा त्या हात । धरोनियां ॥५२१॥
मग गगनाची । पायरी करोन । चढोनि [१] सोपान । सुषुम्नेचा ॥५२२॥
आली हृदयांत । देवी जगदंबा । होय जी का शोभा । चैतन्याची ॥५२३॥
विश्व-बीजांकुरा–। लागीं देई छाया । जी का * आदिमाया । शक्तिरूप ॥५२४॥
निराकार पर–। ब्रह्माची जी पिंडी । जन्मभू उघडी । ॐकाराची ॥५२५॥
परब्रह्मरूप । शिवाची [२] सांबळी । कुंडलिनी बाळी । ऐसी जी का ॥५२६॥
अर्जुना ती तेथ । येतां हृदयांत । ध्वनि *अनाहत । होऊं लागे ॥५२७॥
कुंडलिनीअंगा । जडोनियां होती । पार्था ज्ञानशक्ति । बुद्धीची जी ॥५२८॥
तियेचिना कानीं । आला [३] अळुमाळ । बोल तो केवळ । अनाहत ॥५२९॥
* परा वाणीचिया । कुंडामाजीं देख । होती जीं सुरेख । नाद-चित्रें ॥५३०॥
ॐकार आकृती–। सारिखीं तीं भलीं । कैसीं रेखाटिलीं । उमटती ॥५३१॥
कल्पनेच्या योगें । जाणावें हें साच । तरी कल्पितें च । नाहीं येथें ॥५३२॥
कल्पितें तें मन । आणावें कोठून । जें का [४] शून्यीं लीन । झालें आतां ॥५३३॥
म्हणोनियां काय । गाजे तिये ठायीं । तें चि नेणों कांहीं । धनंजया ॥५३४॥
परी नव्हे तैसें । गेलों विसरोन । तुज कांहीं खूण । सांगायातें ॥५३५॥
जोंवरी पवन । गगनीं तो जाण । नाहीं झाला लीन । संपूर्णत्त्वें ॥५३६॥
तोंवरी तो पार्था । ध्वनि अनाहत । अखंड घुमत । राहे तेथें ॥५३७॥
अखंड ॐकार–। ध्वनीचिया मेघें । दुमदुमों लागे । हृदयाकाश ॥५३८॥

---

*परिशिष्ट पहा.　१ जिना; शिडी.　२ (देव ठेवायची) वेताची करंडी-पेटी.　३ थोडासा.　४ आकाशतत्त्वांत.

मग तेणें घोषें । *ब्रह्मरंध्रद्वार । उघडे सत्वर । आपोआप ।।५३९।।
असे [१] मूर्धास्थानीं । पद्म-गर्भाकारें । जणूं तें दुसरें । महदाकाश ।।५४०।।
अर्जुना जीवात्मा । जेथें उत्कंठित । स्व-रूपाची भेट । घ्यावयासी ।।५४१।।
तयालागीं तृप्त । करावया जाण । शिदोरी घेवोन । तेजाचीच ।।५४२।।
देवी कुंडलिनी । येतसे धांवोन । द्यावया भोजन । हृदयांत ।।५४३।।
बुद्धिरूप शाक । घेवोनियां हातीं । अर्पी तयाप्रति । नैवेद्य तो ।।५४४।।
तेथें द्वैताचें तों । उरे चि ना नांव । अर्पितां सर्वस्व । ऐशा रीती ।।५४५।।
निज-कांति ऐसी । अर्पितां सकळ । झाली ती केवळ । प्राणरूप ।।५४६।।
तिये वेळीं कैसी । भासली तें देख । सांगतों कौतुक । धनंजया ।।५४७।।
असावी का जैसी । पवनाची पुतळी । दिव्य [२] सोनसळी । वेढोनियां ।।५४८।।
आपुलें तें वस्त्र । मग तिनें जाण । ठेवावें सोडोन । वेगळें चि ।।५४९।।
किंवा पवनाची । लागोनि झुळूक । मालवावी देख । दीपज्योति ।।५५०।।
ना तरी ती वीज । जैसी लखलखून । जावी हारपून । आकाशांत ।।५५१।।
तैसी ती हृदय–। कमळापर्यंत । सरी च भासत । सुवर्णाची ।।५५२।।
किंवा तेजोरूप । जळाची ती तेथ । झरी च वाहत । आली काय ! ।।५५३।।
मग हृदयाच्या । मोकळ्या भूमींत । जिरोनियां जात । एकाएकीं ।।५५४।।
शक्ती च माझारीं । शक्तीचें स्वरूप । तेव्हां आपोआप । लय पावे ।।५५५।।
आतां जरी तीतें । म्हणावें शक्ती च । जाणावी ती साच । प्राणरूप ।।५५६।।
तेथें *नाद *बिंदु । *कला आणि *ज्योति । सर्व हारपती । एकाएकीं ।।५५७।।
[३] वायु-निरोधन । जिंकावें कीं मन । ध्यान हि संपूर्ण । सरे तेथें ।।५५८।।
आतां कल्पनेचे । सर्व हि व्यापार । थांबती साचार । स्वभावें चि ।।५५९।।
आटती उघड । पंच-महाभूतें । ऐसी स्थिति तेथें । होय देखा ।।५६०।।
[४] पिंडे चि करावा । पिंडाचा तो लय । *नाथ-संप्रदाय । ऐसा जो का ।।५६१।।
आदिनाथाची ती । [५] अंतरंग खूण । दिली दाखवून । नारायणें ।।५६२।।
तया गूढार्थाची । सोडोनि गाठोडी । झाडोनियां घडी । यथार्थाची ।।५६३।।

---

*परिशिष्ट पहा. १ मस्तकांत. २ पीतांबर. ३ प्राणायाम. ४ शरिरानेंच. ५ गुप्त; गूढ.

उघडोनि ती च । दाखविली येथें । ग्राहक हे श्रोते । जाणोनियां ।।५६४।।

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।
शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ।।१५।।

ऐसें शक्तीचें तें । तेज होतां लीन । जाय हारपोन । देहाकार ।।५६५।।
मग लोकांचिया । दृष्टीलागीं देख । होय तो निःशंक । अगोचर ।।५६६।।
एऱ्हवीं शरीर । पूर्वींसारिखें च । परी गमे साच । वायूचें तें ।।५६७।।
सोपटें काढोन । कर्दळीचा गाभा । किंवा जैसा उभा । करावा तो ।।५६८।।
किंवा नभालागीं । व्हावे हातपाय । तैसें चि तें होय । शरीर गा ।।५६९।।
तयासी सुलभ । आकाशीं संचार । म्हणोनि [1]'खेचर' । नांव देती ।।५७०।।
पार्था ऐसें रूप । पावतां साचार । दिसे चमत्कार । लोकांलागीं ।।५७१।।
साधक तो जातां । निघोनियां वेगें । पाउलें जीं मागें । उमटती ।।५७२।।
सेवेसी सादर । पाउलागणिक । सिद्धि *अणिमादिक । उभ्या तेथें ।।५७३।।
परी आपणासी । तेणें काज काय । पुढील ती सोय । ऐक आतां ।।५७४।।
पृथ्वी आप तेज । देहांचिया देहीं । ऐशापरी पाहीं । लुप्त होती ।।५७५।।
पृथ्वीलागीं जळ । टाकी विरवून । जळा जिरवून । टाकी तेज ।।५७६।।
धनंजया तया । तेजालागीं जाण । लोपवी पवन । हृदयांत ।।५७७।।
मग तो पवन । एकला आपण । राहतो धरोन । देहाकार ।।५७८।।
पुढें पार्था तो हि । [2]मूर्धन्याकाशांत । मिळोनियां जात । संपूर्णत्वें ।।५७९।।
आतां कुंडलिनी । नाम हें लोपोनि । 'मारुत' म्हणोनि । ओळखिती ।।५८०।।
परी शिवरूपीं । जाय ना मिळोन । राहे शक्तिपण । तोंवरी तें ।।५८१।।
मग * जालंधर । बंध उल्लंघून । सर्वथा भेदून । *काकीमुख ।।५८२।।
मूर्धन्याकाशाच्या । पहाडावरती । चढोनि राहाती । होय तेथें ।।५८३।।
ॐकाराच्या पाठीं । देवोनियां पाय । तत्काळ ती जाय । मग पुढें ।।५८४।।
सारोनि पायरी । *पश्यन्तीची मागें । पार्था जाऊं लागे । वरिवरी ।।५८५।।
मग सर्वभावें । नद्या जैशा रीती । मिळोनियां जाती । सागरातें ।।५८६।।

---

*परिशिष्ट पहा. १ आकाशात संचार करणारे (ख=आकाश). २ मस्तकांतील आकाशांत.

* अर्धमात्रेची हि । सीमा ओलांडीत । मूर्धन्याकाशांत । मिळे तैसी ।।५८७।।
पार्था ब्रह्मरंध्रीं । मग स्थिरावोनि । बाहू पसरोनि । सोऽहंभाव ।।५८८।।
परब्रह्मालागीं । देवोनियां मिठी । तद्रूप शेवटीं । होय तेथें ।।५८९।।
महा-भूतांची तों । उरे चि ना वार्ता । ऐसीं एक होतां । शिव-शक्ति ।।५९०।।
आकाशासकट । [1] सामरस्यीं तेथें । आटोनियां जातें । सकळ हि ।।५९१।।
मेघाचिया द्वारा । सागरापासोनि । पार्था झालें पाणी । वेगळें जें ।।५९२।।
तें चि नदीरूप । घेवोनियां जैसें । सागरीं प्रवेशे । पुनरपि ।।५९३।।
धनुर्धरा तैसा । पिंडाचिया मिषें । शिव चि प्रवेशे । शिवामाजीं ।।५९४।।
आतां दुजें होतें । तें चि एक झालें । एक चि कीं ठेलें । स्वत:सिद्ध ।।५९५।।
ऐसी वाटाघाट । करावया जाण । पार्था साक्षी कोण । उरे तेथें ।।५९६।।
मूर्धन्याकाशाचा । चिदाकाशीं लय । ऐसी जी का होय । स्थिति पार्था ।।५९७।।
ती च ब्रह्म-स्थिति । स्वानुभवें साच । नित्य भोगी तो च । सिद्ध जाण ।।५९८।।
संवादाच्या गांवीं । वसे ना ही [2] मात । जी का शब्दातीत । स्वभावें चि ।।५९९।।
* वैखरी जी वाहे । ऐसा अभिमान । कीं हा निवेदीन । अभिप्राय ।।६००।।
ती हि ब्रह्मस्थिती–। पासोनियां पाहें । कैसी दूर राहे । सर्वथैव ।।६०१।।
* मध्यसंधीमाजीं । मकार मात्रेचा । रिघाव तो साचा । होई चि ना ।।६०२।।
आणि शून्यालागीं । भेटावया जाण । एकला तो प्राण । [3] अवघडे ।।६०३।।
परी तो चि शून्यीं । मिळोनियां जातां । आली नि:शब्दता । शब्दालागीं ।।६०४।।
मग शून्याची हि । होतसे आटणी । पार्था महा-शून्यीं । संपूर्णत्वें ।।६०५।।
महा-शून्याचिया । डोहामाजीं आतां । जेथें नाहीं वार्ता । शून्याची हि ।।६०६।।
तेथें बोलासी ह्या । कोठोनियां ठाव । हें तों सर्वथैव । अनिर्वाच्य ।।६०७।।
म्हणोनियां कानीं । ऐकतां येईल । किंवा सांपडेल । बोलामाजीं ।।६०८।।
ब्रह्मस्थिति तैसी । नव्हे ती साचार । जाण हें त्रिवार । सत्य बापा ।।६०९।।
स्वानुभवें ऐसी । ब्रह्मस्थिति प्राप्त । जिये काळीं होत । दैवयोगें ।।६१०।।
तिये वेळीं मग । व्हावें तदाकार । ऐसें चि हें सार । जाणावें गा ।।६११।।

---

*परिशिष्ट पहा. १ ऐक्यांत. २ गोष्ट. ३ अडखळतो. ४ शब्दानें वर्णितां न येण्याजोगें.

जाणणें तें पुढें । उरे चि ना पार्थां । ह्या परी पावतां । तद्रूपता ।।६१२।।
म्हणोनि हें राहो । देखें धनंजया । किती बोलूं वायां । तें चि आतां ।।६१३।।
जेथोनियां ऐसें । होवोनि कुंठित । माघारें फिरत । शब्दजात ।।६१४।।
शिरे ना वारा हि । विचाराचा जेथें । आयुष्य संपतें । संकल्पाचें ।।६१५।।
*उन्मनावस्थेचें । सौंदर्य जें साचें । तेविं * तुरीयेचें । तारुण्य जें ।।६१६।।
जें का अमर्याद । अनादि [१] चोखाळ । विश्वाचें जें मूळ । परब्रह्म ।।६१७।।
तेविं योगरूप । वृक्षाचें जें फळ । चैतन्य केवळ । आनंदाचें ।।६१८।।
आकाराचा प्रांत । मोक्षाचा एकांत । जें का विरहित । आदिअंत ।।६१९।।
महाभूताचें हि । पार्था जें का बीज । जेथोनियां तेज । सूर्यातें हि ।।६२०।।
ऐसें माझें निज–। स्वरूप सहज । तें चि चतुर्भुज । अंकुरलें ।।६२१।।
[२] भक्त-वृंदावरी । *नास्तिकांकडोन । झालें आक्रमण । देखोनियां ।।६२२।।
अर्जुना निर्गुण–। स्वरूपाची भली । देखें प्रकटली । शोभा येथें ।।६२३।।
पार्था, महासुख । ऐसें [३] शब्दातीत । निश्चयें चि प्राप्त । केलें ज्यांनीं ।।६२४।।
स्वयें सुखरूप । होवोनि ते ठेले । कृतकृत्य झाले । येणें मार्गें ।।६२५।।
सांगितलें आम्हीं । ऐसें हें साधन । अनुष्ठिती जाण । [४]शरीरी जे ।।६२६।।
योगाभ्यासें शुद्ध । होवोनि ते भले । माझिया पावले । योग्यतेसी ।।६२७।।
देखें देहाकार । हीच कोणी * मूस । तींत ब्रह्मरस । ओतोनियां ।।६२८।।
पार्था जणूं काय । घडविली मूर्ति । ऐसे चि दिसती । शरीरें ते ।।६२९।।
स्वानुभूति ऐसी । [५]हृदन्तरीं फांके । तरी सर्व झांके । विश्व चि हें ।।६३०।।
तंव पार्थ म्हणे । बोलतां हें साच । संदेह नाहींच । येथें कांहीं ।।६३१।।
सांगितले देवा । तुम्हीं जें साधन । ब्रह्म-प्राप्ति-स्थान । तें चि होय ।।६३२।।
म्हणोनियां तेथें । ब्रह्मसाक्षात्कार । घडेल साचार । जीवालागीं ।।६३३।।
चालविती दृढ । ऐसा योगाभ्यास । निश्चयें तयांस । ब्रह्म-प्राप्ति ।।६३४।।
हें चि आतां मज । भलें कळों आलें । जैसें सांगितलें । तुम्हीं देवा ।।६३५।।
योगाची ही गोष्ट । ऐकतां चि चित्त । होतसे जागृत । ज्ञानाठायीं ।।६३६।।

---

*परिशिष्ट पहा. १ निर्मळ. २ भक्तांच्या समुदायावर. ३ बोलण्याच्या पलीकडील.
४ देहधारी. ५ हृदयात.

तरी येतां मग । [१] प्रचीत ती तैसी । होईल ना कैसी । तल्लीनता ॥६३७॥
म्हणोनियां तुम्हीं । बोलिलें जें कांहीं । [२] अन्यथा तें नाहीं । निःसंदेह ॥६३८॥
परी ऐकें देवा । विनंति ती येथ । देवोनियां चित्त । क्षणभरी ॥६३९॥
आतां तुवां जो हा । सांगितला योग । तो चि आला चांग । मना माझ्या ॥६४०॥
परी माझ्या ठायीं । योग्यतेची [३] वाण । तरी अनुष्ठान । घडे कैसें ॥६४१॥
स्वभावें जें कांहीं । माझ्या अंगीं बळ । तेणें चि केवळ । जरी साधे ॥६४२॥
तरी सुखें हा चि । अभ्यासीन योग । जेणें कार्यभाग । अनायासें ॥६४३॥
किंवा देवा तुम्हीं । बोलिलें साधन । वाटलें कठीण । आचराया ॥६४४॥
तरी तें फिरून । दुजें विचारीन । योग्यतेवांचून । साधेल जें ॥६४५॥
ऐसा चि उद्देश । अंतरीं म्हणोन । जाहलें कारण । पुसावया ॥६४६॥
मग म्हणे देवा । आतां द्यावें चित्त । ऐकिलें का येथ । पुसतसें ॥६४६॥
[४] निरूपिली तुम्हीं । योग-साधना ही । सांग कोणातें हि । साधवेल ? ॥६४८॥
योग्यतेवांचून । किंवा ही साधना । साधेल ना कोणा । ऐसें आहे ? ॥६४९॥
तंव बोले तेथ । देव कृष्णराय । पुससी हें काय । धनुर्धरा ॥६५०॥
हा तों योग-पंथ । थोर मोक्षदायी । परी जें जें कांहीं । आणिक हि ॥६५१॥
सर्वसाधारण । तें तरी साधन । योग्यतेवांचून । सिद्ध होय ? ॥६५२॥
परी योग्यपण । प्राप्तीच्या आधीन । सर्वथैव जाण । धनंजया ॥६५३॥
होवोनियां योग्य । करावें जें काज । फळे तें सहज । आरंभीं च ॥६५४॥
योग्यता ती काय । ऐसी वस्तु आहे । सहजें ती [५] लाहे । बाजारांत ॥६५५॥
आणि योग्यतेची । असे काय खाण । कीं तेथें जावोन । आणावी ती ॥६५६॥
[६] क्षणैक * विरक्त । जाहला जो येथ । तेविं नियमित । देह-धर्मीं ॥६५७॥
ऐसा व्यवस्थित । राहे व्यवहारीं । तो चि अधिकारी । नोहे काय ? ॥६५८॥
लावोनि हा कस । करितां विचार । तुज हि साचार । योग्यता ही ॥६५९॥
अर्जुनाची ऐसी । फेडिली आशंका । प्रसंगें चि देखा । योगेश्वरें ॥६६०॥
मग देव म्हणे । ऐसी ही व्यवस्था । तुजलागीं पार्था । सांगितली ॥६६१॥

---

*परिशिष्ट पहा. १ अनुभव. २ खोटें. ३ कमतरता. ४ सांगितली. ५ मिळते. ६ थोडासा.

सांडोनि नियम । वागे जो [१] यथेष्ट । अपात्र तो येथ । स्वभावें चि ।।६६२।।

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ।।१६।।

जिव्हेचिया राहे । होवोनि [२] अंकित । वाहे जो जीवित । निद्रेलागीं ।।६६३।।
तयालागीं येथें । नाहीं अधिकार । ऐसें चि साचार । बोलिलेंसे ।।६६४।।
किंवा [३] कारागारीं । दुराग्रहाचिया । ठेवी कोंडोनियां । क्षुधा-तृषा ।।६६५।।
तोडितो आहार । मारोनियां भूक । नांव नेघे देख । निद्रेचें जो ।।६६६।।
ऐसा बळकट । घेवोनियां हट्ट । सर्वथा मोकाट । नाचे जो का ।।६६७।।
न राहे तयाचा । देह हि स्वाधीन । योग तो कोठून । मग तेथें ।।६६८।।
म्हणोनियां अति । विषय-सेवन । तेथें नको मन । जाऊं देऊं ।।६६९।।
करावें सर्वथा । किंवा [४] निरोधन । हें हि नको जाण । धनंजया ।।६७०।।

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ।।१७।।

सेवावा आहार । परी परिमित । आणि क्रियाजात । तैसें चि तें ।।६७१।।
नये बोलूं फार । किंवा नको मौन । करावें भाषण । मोजकें चि ।।६७२।।
असावें नेमस्त । चालणें तें पाहीं । वेळीं निद्रेतें हि । मान द्यावा ।।६७३।।
जागणें तें तरी । व्हावें परिमित । येणें [५] समधात । राहे देह ।।६७४।।
धनंजया ऐसें । युक्तीचिया हातें । सर्व इंद्रियांतें । देतां खाद्य ।।६७५।।
मग स्वभावतां । मन चि तें तेथ । करी वृद्धिंगत । संतोषातें ।।६७६।।

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।
निस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ।।१८।।

इंद्रियें तीं ऐसीं । होतां [६] नियंत्रित । तंव अंतरांत । सुख वाढे ।।६७७।।
घडे तेथें योग । स्वभावें तयास । पडे ना सायास । साधनेचा ।।६७८।।
होतां भाग्योदय । उद्योगाचे मिषें । घरा येई जैसें । सर्वैश्वर्य ।।६७९।।
तैसा * संयमी तो । पार्था जेव्हां होत । कौतुकें प्रवृत्त । योगाभ्यासीं ।।६८०।।

---

*परिशिष्ट पहा. १ हवें तसे. २ ताब्यांत. ३ बंदींत. ४ अटकाव. ५ निरोगी.
६ नियमानें वागणारी.

स्वभावतां तेव्हां । *आत्मसिद्धीची च । अनुभूति साच । येई तया ॥६८१॥
म्हणोनियां ऐसा । जो का भाग्यवंत । *संयमें वर्तत । जगामाजीं ॥६८२॥
अर्जुना तो मोक्ष-। रूप सिंहासनीं । विराजे [1] निदानीं । निश्चयें चि ॥६८३॥

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मन: ॥१९॥

योगाचिया अंगा । जडे जैं संयम । प्रयाग-संगम । ऐसा घडे ॥६८४॥
त्या चि पुण्यक्षेत्रीं । करोनि निवास । जयाचें मानस । स्थिरावलें ॥६८५॥
योगयुक्त ऐसें । तया [2] अभिधान । आणिक हि जाण । प्रसंगें तूं ॥६८६॥
[3] निर्वातींचा दीप । तेवतो निवांत । राहे स्वस्थचित्त । तैसा चि तो ॥६८७॥
आतां मनोगत । जाणोनियां तुझें । आम्ही सांगतों जें । तुजलागीं ॥६८८॥
ऐक तें कौन्तेया । देवोनियां चित्त । जेणें तुझें हित । होय अंतीं ॥६८९॥
व्हावी योग-प्राप्ति । ऐसी इच्छा मनीं । न होसी साधनीं । परी दक्ष ॥६९०॥
काय अभ्यासाचें । तुज वाटे भय । अवघड तो होय । म्हणोनियां ॥६९१॥
तरी पार्था, वायां । नको होऊं कष्टी । ऐकोनियां गोष्टी । इंद्रियांच्या ॥६९२॥
इंद्रियें हीं दुष्ट । दाविती [4] बागूल । सर्वथा तो फोल । ऐसें जाण ॥६९३॥
देखें आयुष्यातें । करी जें का स्थिर । सारोनियां दूर । मृत्यूलागीं ॥६९४॥
तया औषधातें । जिव्हा [5] शत्रुवत् । स्वभावें लेखीत । नाहीं काय ॥६९५॥
तैसें आत्म-हित । करोनि जें देतें । तें तें वाटे ह्यांतें । दु:खप्रद ॥६९६॥
नाहीं तरी काय । योगाभ्यासासम । साधन सुगम । दुजें आहे ? ॥६९७॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥२०॥
सुखमात्यन्तिकं यत्तद्बुध्दिग्राह्यमतीन्द्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वत: ॥२१॥

म्हणोनियां दृढ । आसनादि भला । आम्हीं जो बोलिला । योगाभ्यास ॥६९८॥
तेणें इंद्रियांसी । लागला नियम । झालें तरी काम । स्वभावें चि ॥६९९॥

---

*परिशिष्ट पहा. १ शेवटीं. २ नांव. ३ वारा नसलेल्या जागींचा. ४ खोटी भीति. ५ शत्रूप्रमाणें.

१०

इंद्रिय-*निग्रहें । होतां योगाभ्यास । चित्त *चैतन्यास । भेटूं पाहे ।।७००।।
सोडोनि विषय । पाठिमोरें [१] ठाकें । आपण चि देखे । आपणासी ।।७०१।।
मग आत्मरूप । देखतांक्षणीं च । ओळखोनि 'मी च । तत्त्व' म्हणे ।।७०२।।
स्वरूपाची ऐसी । होतां ओळखण । लाभतें संपूर्ण । सुख तया ।।७०३।।
स्वभावें चि मग । चित्त चैतन्यांत । मिळोनियां जात । [२] सामरस्यें ।।७०४।।
जयाहूनि दुजें । आणिक तें नाहीं । इंद्रियां कधीं हि । [३] नेणवे जें ।।७०५।।
ऐशा आत्मरूपीं । होवोनि तद्रूप । राहे आपोआप । आपण चि ।।७०६।।

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ।।२२।।

मग कोसळो का । मेरूहूनि थोर । दुःखाचा डोंगर । देहावरी ।।७०७।।
तया योगियाचें । तरी पार्था चित्त । भारें नाहीं जात । दडपोनि ।।७०८।।
आणि शरीराचा । होवो शस्त्रें घात । अथवा आगींत । सांपडो तें ।।७०९।।
योगियाचें चित्त । महा-सुखीं लीन । म्हणोनियां भान । नाहीं त्याचें ।।७१०।।
ऐसा आत्मरूपीं । होतां चि निमग्न । देहाचें स्मरण । तया कैचें ।।७११।।
पार्था, ब्रह्मसुख । आगळें तो पावे । म्हणोनि नाठवे । दुजें कांहीं ।।७१२।।

तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ।।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ।।२३।।

संसारीं जें मन । राहिलें गुंतून । वासना धरोन । [४] नानाविध ।।७१३।।
ब्रह्मसुखाची ह्या । लागतां चि गोडी । सर्वथा तें सोडी । [५] इच्छाजात ।।७१४।।
ब्रह्मसुख जें का । योगाचें सौंदर्य । राज्य जें का होय । संतोषाचें ।।७१५।।
जयासाठीं व्हावी । ज्ञानाची जाणीव । लागे सावयव । देखावें तें ।।७१६।।
योगाभ्यासें मग । देखतां तें मूर्त । *द्रष्ट्यातें हि येत । तद्रूपता ।।७१७।।

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ।।२४।।

तरी तो चि योग । एके परी सोपा । दावितां *संकल्पा । पुत्र-शोक ।।७१८।।

---

*परिशिष्ट पहा.  १ राहतें.  २ एकरूप होऊन.  ३ जाणतां येत नाहीं.  ४ निरनिराळ्या प्रकारच्या.
५ सर्व इच्छा.

निमाले विषय । ऐसें आइकेल । इंद्रियें देखेल । नियंत्रित ।।७१९।।
तरी संकल्पाची । फुटोनियां छाती । [१]मुकेल तो अंती । [१]जीवित्वासी ।।७२०।।
प्राप्त होतां ऐसी । विरक्ति साचार । सरे [२]येरझार । संकल्पाची ।।७२१।।
मग धनुर्धरा । धैर्य-मंदिरांत । सुखें सदोदित । बुद्धि नांदे ।।७२२।।

शनै:शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मन: कृत्वा न किंचिदपि चिन्तयेत् ।।२५।।
यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ।।२६।।

ऐशापरी होतां । बुद्धि धैर्ययुक्त । अनुभव-पंथ । मना दावीं ।।७२३।।
आणि तयालागीं । आत्म-भुवनांत । करीं प्रस्थापित । हळुहळू ।।७२४।।
ह्या हि एके रीती । ब्रह्म-प्राप्ति आहे । [३]विचारोनि पाहें । धनुर्धरा ।।७२५।।
न घडे हें तुज । तरी पार्था ऐक । सुलभ आणिक । दुजी रीत ।।७२६।।
केला जो निश्चय । न तो ढळूं द्यावा । हा चि नेम घ्यावा । जीवेंभावें ।।७२७।।
येणें चित्तालागीं । जरीं आलें स्थैर्य । तरी झालें कार्य । स्वभावें चि ।।७२८।।
नाहीं तरी द्यावें । मोकळें सोडून । नये आवरून । धरूं त्यासी ।।७२९।।
हिंडेल तें स्वैर । मग जेथें जेथें । तेथोनि मागुतें । परतेल ।।७३०।।
निश्चयें चि ऐसें । लागोनि वळण । स्थिरावेल जाण । अंतर्यामीं ।।७३१।।

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ।।२७।।

स्थिरावतां ऐसें । मग आपोआप । स्वरूपासमीप । येईल तें ।।७३२।।
आत्म-स्वरूपाची । होतां तया भेट । बुडेल तें द्वैत । *अद्वैतांत ।।७३३।।
स्वरूपीं तद्रूप । होतां चि सहजें । विश्व ऐक्य-तेजें । प्रकाशेल ।।७३४।।
आकाशीं जें अभ्र । दुजेपणें होतें । जातां विरोनि तें । आकाशीं च ।।७३५।।
मग जैसें पार्था । सर्वत्र एकलें । स्वभावें [४]कोंदलें । आकाश चि ।।७३६।।
तैसें लया जातां । चित्त चैतन्यांत । होतसे समस्त । ब्रह्मरूप ।।७३७।।

---

*परिशिष्ट पहा. १ नाहींसा होईल. २ फेरा; येजा. ३ विचार करून. ४ भरून राहिलें. ५ सगळेंच.

ब्रह्मप्राप्तीचें हें । सुलभ साधन । सांगितलें जाण । धनंजया ।।७३८।।

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ।।२८।।

पार्था, संकल्पाची । सकळ संपत्ति । सर्वथा [१] परती । ठेवोनियां ।।७३९।।
सहज सुगम । ऐसा योग-पंथ । चोखाळोनि मुक्त । झाले बहु ।।७४०।।
योगस्थितीचें ह्या । ओळखोनि मर्म । सुखें परब्रह्म । पावले ते ।।७४१।।
जैसें जळालागीं । भेटतां [२] लवण । जळातें सांडोन । राहूं नेणे ।।७४२।।
तैसा परब्रह्मीं । होतां योगी लीन । जाय विसरोन । [३] भिन्नत्त्वासी ।।७४३।।
विश्वासंगें तया । ऐक्यमंदिरांत । दिसे लखलखाट । स्वसुखाचा ।।७४४।।
अर्जुना, आपुले । पाठीवरी साच । आपुले पायीं च । चालावें गा ।।७४५।।
ऐसें अवघड । वाटलें हें देख । तरी दुजें ऐक । सांगेन तें ।।७४६।।

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ।।२९।।
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ।।३०।।

माझ्या ठायीं सर्व । सर्वां देहीं मीच । संदेह नाहीं च । येथें कांहीं ।।७४७।।
पार्था, मी विश्वांत । विश्व तें माझ्यांत । ऐसें [४] ओतप्रोत । संचलें गा ।।७४८।।
परी हा चि व्हावा । बुद्धीचा निश्चय । सुलभ ही [५] सोय । सांगितली ।।७४९।।
एऱ्हवीं जो कोणी । सर्वांभूतीं मातें । भजे अभिन्नातें । ऐक्य-भावें ।।७५०।।
आणि भूतांचिया । भेदें अंतरांत । उपजे ना द्वैत । जयाचिया ।।७५१।।
धनंजया, ऐसें । माझें पूर्णपणें । एकत्व चि जाणे । सर्वत्र जो ।।७५२।।
मग माझ्याशीं तो । एकरूप आहे । वायां बोलोनि हें । काय सांगूं ।।७५३।।
एऱ्हवीं हें नाहीं । दाविलें बोलोन । तरी हि तो जाण । मीच आहें ।।७५४।।
दीपाचा प्रकाश । आणिक तो दीप । दोन्ही एकरूप । होती जैसीं ।।७५५।।
तैसा तो पुरुष । राहे माझ्या ठायीं । आणि असें मी हि । तयामाजीं ।।७५६।।

---

१ बाजूस. २ मीठ. ३ वेगळेपणाला. ४ सर्व बाजूंनीं भरून राहिलें. ५ मार्ग.

जोंवरी उदक । तोंवरी तो [१] रस । किंवा अवकाश । आकाशीं तो ॥७५७॥
माझिया स्वरूपें । तैसा रूपवान् । पुरुष तो जाण धनंजया ॥७५८॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थित :
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥३१॥

जैसा वस्त्रामाजीं । एक चि निभ्रांत । तंतु ओतप्रोत । भरलासे ॥७५९॥
तैसें माझें रूप । सर्वत्र संचलें । जेणें देखियेलें । ऐक्य-बोधें ॥७६०॥
किंवा नानाविध । होती अलंकार । सुवर्ण साचार । एक चि तें ॥७६१॥
ऐसा अद्वैताचा । अढळ पर्वत । अंतरीं स्थापित । केला जेणें ॥७६२॥
नातरी वृक्षाचीं । पानें [२]असंख्यात । वृक्ष तो निश्चित । एकला चि ॥७६३॥
ऐसा ऐक्यबोध । प्रकाशे सर्वत्र । सरे जया रात्र । अज्ञानाची ॥७६४॥
स्वानुभवें पार्था । माझ्या योग्यतेस । आला जो पुरुष । ऐशा रीती ॥७६५॥
अडोनि राहील । कैसा उपाधींत । जरी तो दिसत । देहधारी ॥७६६॥
पार्था, माझें सर्व–। व्यापकत्व भलें । तयाचिया आलें । स्वानुभवा ॥७६७॥
म्हणोनियां तो हि । सर्वव्यापी पूर्ण । [३]संबोधिल्यावीण । स्वभावें चि ॥७६८॥
देहधारी तरी । नव्हे तो देहाचा । तया कैसी वाचा । वर्णूं शके ॥७६९॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मत: ॥३२॥

म्हणोनि तें राहो । जो का निरंतर । देखे [४] चराचर । आत्मरूप ॥७७०॥
शुभाशुभ द्वंद्व । नेणे सुख-दु:ख । एक चि नि:शंक । मानी दोन्ही ॥७७१॥
सम-विषम हे । धनंजया, भाव । आणिक हि सर्व । विविध जें ॥७७२॥
तें तें जो पुरुष । मानी सर्वथैव । जैसे अवयव । आपुले चि ॥७७३॥
जया त्रैलोक्य चि । असें मी आघवें । ऐसें चि स्वभावें । ठसावलें ॥७७४॥
तयासी हि असे । शरीर तें एक । म्हणे तया लोक । सुखी दु:खी ॥७७५॥
परी आमुचा तों । ऐसा अनुभव । पार्था [५]सावयव । ब्रह्म चि तो ॥७७६॥
तरी स्वतांमाजीं । विश्व तें देखावें । आणि स्वयें व्हावें । विश्वरूप ॥७७७॥

---

* परिशिष्ट पहा. १ ओलावा. २ अगणित. ३ म्हटल्याशिवाय. ४ सजीव निर्जीव सृष्टि. ५ मूर्तिमंत.

धनंजया, ऐशा । एका साम्याची च । उपासना साच । करावी गा ।।७७८।।
ह्या चि साठीं आम्ही । प्रसंगानुसार । तुज वारंवार । सांगतसों ।।७७९।।
पार्था, समदृष्टी–। पलीकडे कांहीं । दुजी प्राप्ति नाहीं । जगामाजीं ।।७८०।।

अर्जुन उवाच–

योऽयं योगस्त्वया प्रोक्त: साम्येन मधुसूदन ।
एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम् ।।३३।।

चञ्चलं हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।।३४।।

तंव पार्थ म्हणे । देवा दयाघना । करोनि करुणा । आम्हांवरी ।।७८१।।
तुम्हीं साम्यतेचा । केला उपदेश । परी ह्या मनास । करूं काय ।।७८२।।
देखें तयाचा तों । चंचल स्वभाव । आमुचा टिकाव । [1]कैंचा तेथें ।।७८३।।
कैसें केवढें हें । ऐसें पाहूं जातां । तरी तें सर्वथा । सांपडे ना ।।७८४।।
एऱ्हवीं श्रीकृष्णा । पुरे ना तयास । वावरावयास । त्रैलोक्य हि ।।७८५।।
म्हणोनियां ऐसें । कैसें हें घडेल । समाधि साधेल । [2]मर्कटातें ।।७८६।।
रहा म्हणों तरी । कैसा [3]झंझावात । राहेल निवांत । क्षणभरी ।।७८७।।
केला जो निश्चय । तयातें टाळोन । बुद्धीलागीं मन । छळी जें का ।।७८८।।
आणि धैर्याचिया । हातावरी हात । मारोनियां जात । पळोनि जें ।।७८९।।
पाडीतसे भूल । जें का विवेकातें । तेविं संतोषातें । [4]नादीं लावी ।।७९०।।
आणि एके ठायीं । बैसावें तरी हि । जें का दिशा दाही । हिंडवितें ।।७९१।।
येई उसळोनि । निरोधावें तरी । संयम चि करी । साह्य जया ।।७९२।।
ऐसें तें चंचळ । मन सर्वथैव । आपुला स्वभाव । सांडील का ? ।।७९३।।
म्हणोनियां मन । राहील निश्चळ । साम्य तें लाधेल । मग आम्हां ।।७९४।।
घडावें हें देवा । कैसें अघटित । [5]साशंकलें चित्त । ह्या चि लागीं ।।७९५।।

श्रीभगवानुवाच–

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।

---

१ कोठून.  २ माकडाला.  ३ सोसाट्याचा वारा.  ४ भुलवितें.  ५ शंकित झाले.

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।।३५।।

तंव योगेश्वर । बोले पार्थाप्रति । मनाची ह्या स्थिति । तैसी च गा ।।७९६।।
स्वभावें चि मन । चंचल हें जाण । नव्हे अप्रमाण । बोल तुझा ।।७९७।।
परी वैराग्याच्या । [1] अधिष्ठानें नीट । चोखाळावी वाट । अभ्यासाची ।।७९८।।
ऐसा कांहीं काळ । होतां चि अभ्यास । लाभेल तयास । सुस्थिरता ।।७९९।।
मनाचें कीं पार्था । असे एक भलें । तया आवडलें । जें जें कांहीं ।।८००।।
तेथें चि तें पाहें । [2] सोकावोनि राहे । अनायासें [3] लाहे । तद्रूपता ।।८०१।।
म्हणोनि तयातें । कौतुकें साचार । दावीं वारंवार । आत्मसुख ।।८०२।।

असंयातात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ।।३६।।

एऱ्हवीं विरक्ति । नाहीं जयांप्रति । न कधीं रिघती । अभ्यासीं जे ।।८०३।।
तयांसी हें मन । नावरे निभ्रांत । आमुचें हि मत । ऐसें चि गा ।।८०४।।
*यमनियमांची । न चालती वाट । नाठविती गोष्ट । वैराग्याची ।।८०५।।
विषयांचें जळ । त्यांत सर्वकाळ । बुडोनि केवळ । राहिले जे ।।८०६।।
जन्मल्यापासोन । जयांचें का मन । योगाचें [4] संधान । नेणे कदा ।।८०७।।
सांगें कैसें काय । तयांचें तें मन । एकाग्र होवोन । स्थिरावेल ।।८०८।।
म्हणोनियां मन । आवरलें जाय । ऐसा जो उपाय । आहे कांहीं ।।८०९।।
धनुर्धरा तोचि । आरंभोनि पाहें । निग्रह तो नोहे । मग कैसा ।।८१०।।
नाहीं तरी योग-। साधन जें होय । सर्व हि तें काय । अप्रमाण ।।८११।।
परी अभ्यासाची । गांठावया तड । आपणासी जड । ऐसें म्हण ! ।।८१२।।
पार्था, जरी होय । अंगीं योग-बळ । त्यापुढें चपळ । मन किती ।।८१३।।
*महत्तत्त्वादिक । सकळ हें जाण । नव्हे का स्वाधीन । योग-बळें ।।८१४।।
तेव्हां तो अर्जुन । म्हणे देवा भलें । तुम्हीं सांगितलें । सत्य चि तें ।।८१५।।
योग-बळासवें । देखा मनो-बळ । साच चि तोलेल । ऐसें नाहीं ।।८१६।।
तरी तो चि योग । कैसा केविं जाणों । [5] गंधवार्ता नेणों । ह्याची कांहीं ।।८१७।।

---

१ आधारानें. २ चटक लागून. ३ मिळवितें. ४ उपाययोजना; रीती. ५ थोडीही माहिती.

म्हणोनियां देवा । मन अनावर । ऐसें आजवर । म्हणों आम्हीं ॥८१८॥
तुझ्या कृपें आज । जन्मांत ह्या देख । योगाची ओळख । झाली आम्हां ॥८१९॥

अर्जुनउवाच–

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥३७॥

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥३८॥

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥३९॥

परी प्रभो एक । संशय आणिक । उपजला देख । स्वभावें चि ॥८२०॥
तुझियावांचोन । कराया तो दूर । समर्थ साचार । दुजा नाहीं ॥८२१॥
तरी सांगें देवा । [1] श्रद्धाबळें कोणी । गांठायालागोनि । मोक्ष-पद ॥८२२॥
[2] प्रवर्तला येथ । [3] नेणोनि साधन । निघे गांवाहून । इंद्रियांच्या ॥८२३॥
आत्मसिद्धिरूप । पुढिलिया गांवीं । [4] नांदणूक व्हावी । म्हणोनियां ॥८२४॥
आस्थेचिया वाटे । चालतां निःशंक । मावळला [5] अर्क । आयुष्याचा ॥८२५॥
आत्म-सिद्धि तरी । नाहीं झाली प्राप्त । नाहीं येववत । मागुतें हि ॥८२६॥
सहजें अकाळ । अभ्र जें विरळ । वर्षे ना तें जळ । राहे हि ना ॥८२७॥
तैसीं तयालागीं । दोन्हीं अंतरलीं । दूर ती राहिली । मोक्ष-प्राप्ति ॥८२८॥
आणि अंतरांत । श्रध्देचें सामर्थ्य । तेणें झाला व्यर्थ । संसार हि ॥८२९॥
ऐसा दोहोंतें हि । जो का अंतरला । देखें मग्न झाला । श्रद्धेमाजीं ॥८३०॥
तयातें कोणती । गति लाभे अंतीं । तें चि मजप्रति । सांगें आतां ॥८३१॥

श्रीभगवानुवाच–

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥४०॥

मग तो श्रीकृष्ण । म्हणे पार्था पाहें । जया आस्था आहे । मोक्ष-सुखीं ॥८३२॥

---

१ श्रद्धेच्या जोरावर. २ तयार झाला. ३ न जाणतां. ४ राहतां यावें. ५ सूर्य.

तया मोक्षाविण । सर्वथा आणिक । गति नाहीं देख । दुजी कोठें ॥८३३॥
परी एवढेंच । एक घडे साच । विसांवा मध्यें च । घ्यावा लागे ॥८३४॥
त्या हि विश्रांतींत । जी का सुखप्राप्ति । पार्था, लाभे ना ती । देवांसी हि ॥८३५॥
एऱ्हवीं तो जरी । चालता सत्वर । योगाभ्यासीं भर । देवोनियां ॥८३६॥
तरी * सोऽहंसिद्धि । पावता तो साच । [१] देहान्तापूर्वीं च । पंडुसुता ॥८३७॥
परी नव्हे त्याचा । तेवढा तो वेग । म्हणोनिया चांग । विसावा चि ॥८३८॥
तयालागीं अंतीं । मोक्ष तो तैसाच । धनंजया, साच । ठेविलासे ॥८३९॥

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वती: समा: ।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥४१॥

कैसें हें कौतुक । अर्जुना जो लोक । पावावया देख । शत यज्ञ ॥८४०॥
करोनि इंद्रास । पडती सायास । तो चि मुमुक्षूस । अनायासें ॥८४१॥
तेथील [२] अमोघ । अलौकिक भोग । भोगितां तो मग । कंटाळोनि ॥८४२॥
जन्म पावे येथें । पुन्हां संसारांत । [३] वैभवश्रीयुक्त । कुळामाजीं ॥८४३॥
जैसा भातकण । वाढे सुक्षेत्रांत । तैसा त्या कुळांत । अंकुरे तो ॥८४४॥
होय जें सकळ । धर्माचें माहेर । वर्ततें साचार । नीतिपंथें ॥८४५॥
जिये कुळीं सत्य । पवित्र भाषण । आणिक दर्शन । शास्त्रशुद्ध ॥८४६॥
जिये कुळीं वेद । जागृत दैवत । व्यापार विहित । आचरण ॥८४७॥
जेथें सारासार– । विचार हा थोर । मंत्री निरंतर । कार्यकर्ता ॥८४८॥
तेवीं चि गा पार्था । जिये कुळीं [४] चिंता । झाली पतिव्रता । [४] ईश्वराची ॥८४९॥
जिये कुळीं गृह–। देवतासंपत्ति । ऐशी सर्व स्थिति । सानुकूल ॥८५०॥
जिये कुळीं सर्व–। सुखाचा व्यापार । वाढला साचार । पूर्व-पुण्यें ॥८५१॥
पार्था, योगभ्रष्ट । सुखें पावे जन्म । ऐशा चि उत्तम । कुळामाजीं ॥८५२॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥४२॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।

---

*परिशिष्ट पहा. १ मरणाआधींच. २ फलदायी. ३ धनवैभवसंपन्न. ४ फक्त ईश्वराचेंच चिंतन.

यथते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥४३॥

किंवा ज्ञानाग्नींत । करिती हवन । वैदिक जे पूर्ण । ब्रह्मनिष्ठ ॥८५३॥
जे का ब्रह्मानंद–। क्षेत्रींचे [१] मिराशी । नित्य-सुखराशि । भोगिती जे ॥८५४॥
बैसोनि सिद्धांत–। रूप सिंहासनीं । राज्य त्रिभुवनीं । करिती जे ॥८५५॥
होवोनि कोकिळ । संतोषाच्या वनीं । गाती गोड गाणीं । स्वानंदें जे ॥८५६॥
विवेक-वृक्षाच्या । बैसोनियां बूडीं । ब्रह्मफळगोडी । चाखिती जे ॥८५७॥
तयां योगियांच्या । कुळीं पावे जन्म । पार्था, [२] मोक्ष-काम । योगभ्रष्ट ॥८५८॥
जन्मतां चि मग । आत्मज्ञानोदय । तयालागीं होय । स्वभावें चि ॥८५९॥
सूर्याचा उदय । होतां चि गा देखें । तयाआधीं फांके । प्रभा जैसी ॥८६०॥
तैसी प्रौढत्वाची । न पाहतां वाट । न होतां पहांट । तारुण्याची ॥८६१॥
बाळपणीं च ती । तया योगभ्रष्टा । साच सर्वज्ञता । माळ घाली ॥८६२॥
मागील जन्मीं च । तयाची तों बुद्धि । पावलीसे सिद्धि । सर्वथैव ॥८६३॥
म्हणोनि तयाचें । मन चि तें आतां । प्रसवतें पार्था । सर्व विद्या ॥८६४॥
मग शास्त्रजात । आपोआप जाण । निघे मुखांतून । तयाचिया ॥८६५॥
देखें ऐसें जें का । पुण्यकुळीं जन्म । देव हि सकाम । जयासाठीं ॥८६६॥
जप-होमादिक । करिती साचार । पार्था, निरंतर । स्वर्गामाजीं ॥८६७॥
अमर हि * भाट । होवोनि वानिती । मृत्युलोकाप्रति । जयासाठीं ॥८६८॥
ऐसें जें का पुण्य । पावन उत्तम । तें तो पावे जन्म । योगच्युत ॥८६९॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥४४॥

मागिलिया जन्मीं । आयुष्याच्या अंतीं । प्राप्त झाली होती । सद्बुद्धि जी ॥८७०॥
पुढिलिये जन्मीं । मग तया ती च । पुन्हां लाभे साच । नित्य नवी ॥८७१॥
आधीं च * पायाळू । आणि भाग्यवान् । वरी दिव्यांजन । घाली डोळां ॥८७२॥
मग जैसा देखे । पाताळींचें धन । कौतुकें तो जाण । धनंजया ॥८७३॥
तैसे जे कठिण । गूढ [३] अभिप्राय । किंवा जें प्रमेय । [४] गुरुगम्य ॥८७४॥

---

* परिशिष्ट पहा. १ वतनदार. २ मोक्षाची इच्छा करणारा. ३ अर्थ; भाव. ४ गुरूकडूनच समजणारें.

तयाच्या बुद्धीस । प्रयत्नावांचोन । सहजें संपूर्ण । आकळे तें ॥८७५॥
इंद्रियें प्रबळ । सर्वथा तीं जाण । मनाच्या आधीन । होती मग ॥८७६॥
प्राणामाजीं मन । एकवटे पूर्ण । मिळों लागे प्राण । [1] शून्यालागीं ॥८७७॥
ऐसा योगाभ्यास । स्वभावें चि होय । नेणों कैसा काय । धनंजया ॥८७८॥
आणि तयाचिया । मनो–मंदिरांत । येवोनि रहात । समाधि ती ॥८७९॥
देखें आदिमाया–। भवानी– [2] गौरव । जणूं तो * भैरव । [3] योगपीठीं ॥८८०॥
किंवा जणूं काय । वैराग्य-सिद्धीचा । अनुभव साचा । प्रकटला ॥८८१॥
ना तरी संसार । मोजण्याचें माप । साहित्याचें [4] द्वीप । योगाचिया ॥८८२॥
देखें धनंजया । सुगंधें चि साचें । जैसें चंदनाचें । घ्यावें रूप ॥८८३॥
तैसा संतोषाचा । घडिला तो येथ । * साधकावस्थेंत । असोनि हि ॥८८४॥
दिसे * सिद्धांचिया । समुदायांतून । जणूं निवडून । काढिला कीं ॥८८५॥

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥४५॥

वर्षें कोट्यवधि । सहस्र जन्मांचे । प्रतिबंध साचे । ओलांडोनि ॥८८६॥
तरोनि संसार । आत्मसिद्धि-तीर । गांठलें साचार । तयानें तें ॥८८७॥
म्हणोनियां साध्य । तयालागीं होती । सर्व साधनें तीं । आपोआप ॥८८८॥
ऐसा तो साधक । मग अनायासें । राज्यावरी बैसे । विवेकाच्या ॥८८९॥
विचाराचा वेग । होवोनियां स्थिर । विवेक माघार । घेई जेथें ॥८९०॥
तेथें स्वरूपीं त्या । मग पार्था पाहें । साधक तो राहे । जडोनियां ॥८९१॥
तेथें मनोमेघ । जातसे विरोन । सरे वारेपण । वाऱ्याचें हि ॥८९२॥
आणि आकाश हि । आपुल्या चि ठायीं । मुरोनियां जाई । पूर्णपणें ॥८९३॥
ॐकाराचा माथा । बुडोनियां जात । ऐसें शब्दातीत । सुख लाभे ॥८९४॥
म्हणोनि आधींच । बोला पडे मौन । ऐसी जी गहन । ब्रह्मस्थिति ॥८९५॥
अमूर्त सकळ–। गतींची जी गति । तियेची तो मूर्ति । स्वयें होय ! ॥८९६॥
जन्मजन्मान्तरीं । तयानें साचार । झाडियेला केर । [5] विक्षेपाचा ॥८९७॥

---

१ आकाशातत्त्वाला.　२ शोभा; वैभव.　३ योगरूपी आसनावर.　४ बेट; जागा.　५ मनाच्या चंचलतेचा.

म्हणोनि हा जन्म । पावतां क्षणीं च । [1] लग्न-घटि साच । [1] बुडाली ती ।।८९८।।
पार्था, जैसें अभ्र । विरोनियां जातां । पावे तद्रूपता । आकाशीं तें ।।८९९।।
ब्रह्मस्वरूपाशीं । तैसें त्याचें लग्न । लागोनि अभिन्न । जाहला तो ।।९००।।
जेथोनियां विश्व । होतसे निर्माण । होतें पुन्हा लीन । स्वरूपीं ज्या ।।९०१।।
स्वयें तें स्वरूप । होवोनि तो राहे । [2] विद्यमानें देहें । धनंजया ।।९०२।।

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिक: ।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ।।४६।।

धैर्य-बाहूवरी । ठेवोनि विश्वास । धरोनियां आस । वस्तूची ज्या ।।९०३।।
घालिती ते उडी । देखें कर्मनिष्ठ । पार्था प्रवाहांत । *षट्कर्मांच्या ।।९०४।।
किंवा प्राप्त व्हावी । वस्तु जी म्हणोन । [3] कवच लेवोन । ज्ञानाचें गा ।।९०५।।
येथें ज्ञानी जन । झुंजती नि:शंक । रणांगणीं देख । प्रपंचाशीं ।।९०६।।
किंवा तपस्वी ते । धरोनि जी चाड । जो का अवघड । तपोदुर्ग ।।९०७।।
चढावया जाती । जयाचा हि कडा । बहु निसरडा । निराधार ।।९०८।।
देखें भजकांसी । जें का भजनीय । यजन-विषय । याज्ञिकांचा ।।९०९।।
ऐसें सकळांसी । सर्वकाळीं होय । जें का पूजनीय । परब्रह्म ।।९१०।।
साधकांचें साध्य । स्वरूप [4] निर्वाण । स्वयें तें आपण । जाहला तो ।।९११।।
म्हणोनि तो होय । कर्मनिष्ठां वंद्य । तपस्व्यांचा आद्य । तपोनाथ ।।९१२।।
जाणावयाजोगा । ज्ञानियांतें साच । धनंजया तो च । एक जगीं ।।९१३।।
जीव-परमात्मा–। संगम पावन । तेथें झालें लीन । मन ज्याचें ।।९१४।।
अर्जुना तो येथें । देहधारी झाला । तरी लाभे त्याला । थोरवी हि ।।९१५।।
म्हणोनियां सांगें । सर्वदा मी तूतें । योगी होईं चित्तें । पंडु-सुता ।।९१६।।

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मत: ।।४७।।

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे ध्यानयोगो नाम षष्ठोऽध्याय: ।।६।।

---

१ (ब्रह्माशीं एकरूप होण्याचा) मुहूर्त प्राप्त झाला. २ ह्याच देहानें. ३ चिलखत. ४ मोक्ष.

जयालागीं देती । योगी ऐसें नांव । जाणावा तो देव । देवांचा हि ।।९१७।।
तो चि माझें सुख । सर्वस्व [१] निधान । स्वभावें तो प्राण । असे माझा ।।९१८।।
पाहें पार्था, [२] भज्य । भजता भजन । आघवें साधन । भक्तीचें हें ।।९१९।।
जया योगियासी । स्वानुभव-बळें । मद्रूप चि झालें । अखंडित ।।९२०।।
मग प्रेमभाव । परस्परांतील । वर्णितां येईल । बोलांमाजीं ।।९२१।।
नव्हे चि तो ऐसा । धनंजया, साच । एकरूपता च । तया आम्हां ।।९२२।।
तया ऐक्य-प्रेमा । साजेल उपमा । देह मी तो आत्मा । हीच एक ।।९२३।।
ऐसें भक्तरूपी । * चकोराचा चंद्र । एक चि नरेंद्र । त्रैलोक्याचा ।।९२४।।
गुणाचा सागर । बोलिला श्रीपति । सांगे राजाप्रति । संजय तो ।।९२५।।
पार्थाचिया ठायीं । श्रवणाची आस्था । होती ती च आतां । [३] दुणावली ।।९२६।।
प्रभु यादवेंद्रा । ऐसें कळों आलें । तेणें चित्त [४] धालें । स्वभावें चि ।।९२७।।
आपुलें भाषण । यथार्थ ग्रहण । कराया [५] दर्पण । पार्थ झाला ।।९२८।।
म्हणोनियां देव । आनंदाच्या भरें । आतां जें विस्तारें । निरूपील ।।९२९।।
तो चि आहे पुढें । प्रसंग रसाळ । जेथें प्रकटेल । शांतरस ।।९३०।।
सिद्धान्तबीजाचा । भरोनि ठेविला । *मुडा उघडिला । जाईल तो ।।९३१।।
सत्त्वगुणाचा कीं । होवोनि वर्षाव । भरा आला भाव । श्रोतयांचा ।।९३२।।
तेणें * आध्यात्मिक । तापाचीं ढेंकुळें । जातां चि सकळें । विरोनियां ।।९३३।।
चतुर भाविक–। चित्ताचे ते भले । वाफे सिद्ध झाले । अनायासें ।।९३४।।
अवधानरूप । पेरणीचा होय । सुवर्णसमय । त्या हि वरी ।।९३५।।
म्हणोनियां ज्ञान–। बीज पेरायातें । निवृत्तिनाथातें । इच्छा झाली ।।९३६।।
ज्ञानदेव म्हणे । सद्गुरूंनीं भलें । मज * चाडें केलें । कौतुकें चि ।।९३७।।
आणि मस्तकीं तो । ठेवोनियां हात । घातलें चाड्यांत । बीज जणूं ।।९३८।।
म्हणोनि अंतरीं । होतां चि स्फुरण । जें जें मुखांतून । निघे माझ्या ।।९३९।।
तें तें सज्जनांसी । होईल प्रमाण । भरंवसा पूर्ण । ऐसा मज ।।९४०।।
असो हें समस्त । सांगेन प्रस्तुत । काय भगवंत । बोलिले तें ।।९४१।।

---

*परिशिष्ट पहा. १ ठेवा. २ ज्याचें भजन करावयाचें तो. ३ दुप्पट झाली. ४ तृप्त झालें. ५ आरसा.

परि तें ऐकावें । मनाचिया कानीं । देखावें नयनीं । बुद्धीचिया ।।९४२।।
आपुल्या चित्ताचें । देवोनियां [1] मोल । मग घ्यावे बोल । येथींचे हे ।।९४३।।
[2] अवधानाचिया । हातें नेवोनियां । सोडावें हृदया–। माजीं ह्यांतें ।।९४४।।
करोनि संतुष्ट । जाणत्यांची [3] मति । देतील हे शांति । स्व-हितासी ।।९४५।।
पूर्णावस्थेलागीं । होतील जीवन । जीवा सुखपूर्ण । करितील ।।९४६।।
आतां बोलतील । कौतुकें श्रीकृष्ण । सुंदर भाषण । अर्जुनाशीं ।।९४७।।
ज्ञानदेव म्हणे । बोल ते यथार्थ । ओंवीच्या * छंदांत । सांगेन मी ।।९४८।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

षष्ठोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: ।

श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

*परिशिष्ट पहा. १ किंमत; मोबदला. २ लक्ष; एकाग्रता. ३ बुद्धि.